रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ८८
www.ramprahar.com

सोमवार, १४ ऑक्टोबर २०२४ ◆पाने ८◆किंमत ₹२

अंतरंग

अष्टविनायक मंदिरांचा होणार जीर्णोद्धार; आराखडा मंजूर/२
रोहे शहरावर सीसीटीव्हीची राहणार करडी नजर/५
रायगडच्या पाच तायक्कांडोपटूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड/८

## एनएमएमटीमध्ये महिलांना तिकीट दरात ५०% सवलत



**नवी मुंबई** : येथील नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमामार्फत (एनएमएमटी) पालिका कार्यक्षेत्रात व हद्दीबाहेर मुंबई, बोरीवली, ठाणे, डोंबिवली, कल्याण, दहिसर, अंबरनाथ, बदलापूर, पनवेल, उलवे नोड, खोपोली, कर्जत, वाशिवली, रसायनी या विभागात ४० सर्वसाधारण व ३७ वातानुकूलित अशा एकूण ७७ विविध बसमार्गांवर प्रवासी सेवा देण्यात येते. महाराष्ट्र शासनाच्या महिला सशक्तीकरण अभियानाच्या संकल्पनेतून व महिला सन्मानार्थ महिलांसाठी एनएमएमटी बसधून प्रवास करताना तिकीट दरात ५०% सवलत देण्याच्या प्रस्तावास नमुंमपा आयुक्त तथा प्रशासक यांनी मंजुरी दिली आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषित केल्यानुसार सोमवार (दि. १४)पासून सवलत ही लागू करण्यात येत आहे. अंदाजे ८० हजार महिला प्रवाशांना याचा लाभ होणार आहे.

# पायाभूत सुविधा निर्मितीत महाराष्ट्र अव्वल

## मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन; ठाणे खाडी पूल उत्तर वाहिनीचे लोकार्पण

### कोकणातील सात खाडी पुलांचेही झाले भूमिपूजन





**ठाणे : प्रतिनिधी**

राज्याच्या कुठल्याही भागात गेलात तर सध्या सर्वत्र विविध प्रकल्प, विकास कामे सुरू आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ जवळपास दोन लाख कोटींचे प्रकल्प राबवित आहे. पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या निर्मितीत महाराष्ट्र राज्य देशात क्रमांक एकवर असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. १३) वाशी येथे केले.

सायन–पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पूल क्र. ३च्या मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या उत्तर वाहिनी मार्गिकेचे उद्‌घाटन आणि रेवस (रायगड) ते रेडी (सिंधुदुर्ग) या सागरी महामार्गावरील सात खाडी पुलांच्या कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)मंत्री दादाजी भुसे, माजी खासदार राहुल शेवाळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर–पाटणकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिलकुमार गायकवाड, सहव्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, मुख्य अभियंता राजेश निघोट, मुख्य अभियंता एस.के. सुरवसे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी ठाणे खाडी पूल क्र. ३च्या उत्तर वाहिनीच्या लोकार्पणाबरोबर रेवस–रेडी सागरी महामार्गावरील धरमतर, कुंडलिका, आगरदांडा, बाणकोट, केळशी, जयगड आणि कुणकेश्वर या सात खाडी पुलांचे भूमिपूजन दूरदृश्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्रीमहोदयांच्या हस्ते झाले. स्थानिक स्तरावर प्रत्येक खाडी पुलाच्या कामाचे प्रत्यक्ष भूमिपूजन स्थानिक मान्यवर लोकप्रतिनिधींच्या हस्ते उत्साहात करण्यात आले. या सात खाडी पुलांची एकूण लांबी २६.७० किलोमीटर असून त्यासाठी सात हजार ८५१ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, रेवस ते रेडी सागरी महामार्गावरील सात खाडी पुलांची मागणी राज्याच्या स्थापनेपासून होती. ती मागणी आज पूर्ण होतेय. हा योगायोग आहे. या खाडी पुलांमुळे कोकणाचा विकास होईलच, शिवाय पर्यटनाला चालना मिळेल. कोकणवासीयांसाठी ही दिवाळीची भेटच आहे. त्यांनी पुढे म्हटले, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांच्या माध्यमातून राज्यात पाच हजार किमी लांबीचे द्रुतगती मार्गाचे ग्रीड नेटवर्क उभारणार आहोत. त्यामुळे राज्याच्या कुठल्याही भागातून कुठेही सहा ते सात तासात पोहचता येईल. पनवेल ते सिंधुदूर्गदरम्यानच्या कोकण ग्रीन फिल्ड एक्स्प्रेस वेचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हाती घेतले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई ते कोकण हे अंतर अवघ्या पाच तासात पार करता येईल.

ठाणे खाडी पूल क्र. ३ची उत्तर वाहिनी या तीन पदरी पुलामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास निश्चितच यश येईल, असा विश्वास व्यक्त करून सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या दक्षिण वाहिनीच्या पूलाचे कामही अत्यंत वेगाने प्रगतिपथावर आहे. आज दुग्धशर्करा योग म्हणजे रेवस–रेडी या सागरी महामार्गावरील सात खाडी पुलांचे भूमिपूजन एकाच वेळी होत आहे. या परिसरातील निसर्गाला अनुरूप असे केबल स्टे व इतर प्रकारांच्या पुलांची निर्मिती रस्ते विकास महामंडळ अत्यंत कल्पकतेने करणार आहे.

दरम्यान, या वेळी ठाणे खाडी पुलाची मुंबईहून पुण्याला जाणारी उत्तर वाहिनी वाहतुकीसाठी सोमवार (दि. १४)पासून सुरू होणार असल्याचे जाहीर करण्यात आले. यामुळे वाहनचालक, प्रवाशांना मार्गक्रमण करणे सुलभ होणार आहे. सरकारकडून पार्याभूत सुविधांवर जोर दिला जात आहे.

# बाबा सिद्दीकी हत्येप्रकरणी दोन मारेकरी अटकेत



**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची शनिवारी रात्री तीन जणांनी गोळ्या झाडून मुंबईतील वांद्रे येथे हत्या केली होती. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून तिसऱ्या फरारी आरोपीचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. दरम्यान, आरोपी बिश्नोई गँगशी संबंधित असल्याची पोस्ट व्हायरल झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात गुरुमेल बलजित सिंग (२३, हरियाणा) आणि धर्मराज राजेश कश्यप (१९, उत्तर प्रदेश) या दोघांना अटक करण्यात आली आहे. त्यांना रविवारी (दि. १३) न्यायालयात हजर करण्यात आले असता गुरमेलला २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली, तर धर्मराजच्या वय निश्चितीसाठी हाडांची चाचणी करण्यासंबंधीचे निर्देश देण्यात आले. तिसरा फरार आरोपी शिवकुमार गौतम उर्फ शिवा (३०, उत्तर प्रदेश) याचा शोध सुरू आहे.

> **ही दुर्दैवी आणि अतिशय गंभीर घटना आहे. बाबा सिद्धीकी यांच्याशी माझी निकटची मैत्री होती. अनेक वर्ष आम्ही सोबत काम केले. त्यामुळे आम्हाला सगळ्यांनाच धक्का बसलेला आहे. या घटनेतील दोन आरोपी पकडलेले आहेत. त्यांची चौकशी सुरू आहे.**
> **–देवेंद्र फडणवीस, गृहमंत्री**

## मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावरून उद्धव ठाकरेंचे एक पाऊल मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा, अशी मागणी उबाठा पक्षाचे प्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सातत्याने करत होते, मात्र हरियाणा विधानसभा निकालानंतर ठाकरेंसह 'मविआ'ने सावध पवित्रा घेतला आहे.

निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी महाविकास आघाडीने रविवारी (दि. १३) संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या वेळी उद्धव ठाकरे यांनी अगोदर महायुतीने मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करावा, त्यानंतर आम्ही जाहीर करू, असा पवित्रा घेतला. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही त्यास सहमती दर्शवली.

'मविआ'ने निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करावा, अशी मागणी सातत्याने उद्धव ठाकरे करत होते. त्यांनी दिल्लीत जाऊन काँग्रेस नेते राहुल गांधींसह इतर नेत्यांचीही भेट घेतली होती, मात्र हरियाणा विधानसभेच्या निकालानंतर ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावरून एक पाऊल मागे घेतल्याचे चित्र आहे.

## मनसे 'विधानसभा' स्वबळावर लढणार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना आगामी विधानसभा निवडणूक ही स्वबळावर लढवणार आहे, अशी घोषणा पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी (दि. १३) पदाधिकारी मेळाव्यात केली.

राज म्हणाले, आगामी निवडणुकीसाठी आपण स्वतंत्रपणे महाराष्ट्राला सामोरे जाणार आहोत. निकालानंतर मनसे हा सत्तेतील पक्ष असेल. ज्या लोकांनी आपल्याकडून अपेक्षा ठेवल्या आहेत, त्यांना आपण उत्तम महाराष्ट्र घडवून दाखवू. जगाला हेवा वाटवा असा महाराष्ट्र घडावा अशी माझी इच्छा आहे.

## निवडक

### पुणे बलात्कार प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे

**पुणे** : बोपदेव घाटातील सामूहिक बलात्कार प्रकरणाचा तपास पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुन्हे शाखेकडे सोपविण्याचे आदेश दिले. बोपदेव घाट परिसरात ३ ऑक्टोबर रोजी रात्री मित्राबरोबर फिरायला आलेल्या महाविद्यालयीन तरुणीवर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची घटना घडली होती. याबाबत कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणी एका तरुणाला अटक करण्यात आली असून त्याच्या दोन साथीदारांचा शोध सुरू आहे.

### राज्यात परतीच्या पावसाचा मुक्काम आणखी वाढला

**मुंबई** : राज्यात पुन्हा एकदा पावसाने जोर धरला असून परतीच्या या पावसाचा मुक्काम वाढला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता असून काही जिल्ह्यांना अलर्ट देण्यात आला आहे. राज्यातील हवामानात काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. अशातच परतीच्या पावसाचा मुक्काम वाढला आहे. काही भागात रविवारीही (दि. १३) पाऊस पडला.

# पाच वर्षात केलंय त्यापेक्षा दुप्पट काम करून दाखवणार –आमदार महेश बालदी

## जांभिवली, चावणे हद्दीत विकासकामांचे भूमिपूजन

### अनेकांचा भाजपमध्ये प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पाच वर्षाच्या आमदारकीच्या काळात प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली याचे मला समाधान आहे. येत्या निवडणुकीतही तुमचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी द्या. जे काम केलंय त्यापेक्षा दुप्पट काम करून दाखवेन, असा विश्वास आमदार महेश बालदी यांनी व्यक्त केला.

उरण मतदारसंघातील जांभिवली आणि चावणे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीमध्ये आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक आमदार विकास निधीमधून करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा जांभिवली येथील जिल्हा परिषद शाळेत रविवारी (दि. १३) झाला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून आमदार महेश बालदी यांच्या दमदार नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेकांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे आमदारमहोदयांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास भाजप जिल्हा चिटणीस माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, गुळसुंदे विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, केळवणे जि.प. विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, संजय टेंबे, जांभिवलीच्या माजी सरपंच रिया कोंडीलकर, सदस्य शेखर जाधव, राजेंद्र कोंडीलकर, संदीप कोंडिलकर, प्रकाश कोंडीलकर, कराडे खुर्दचे माजी सरपंच विजय मुरकुटे, साईचे माजी सरपंच विद्याधर मोकल, युवा मोर्चा उपाध्यक्ष दिनेश पाटील, गणेश पाटील, मदन खारके, नंदू गावंड, रामचंद्र मोकल, शेखर जाधव, राकेश घरत, संदीप गोडिवले, काशिनाथ गोडिवले, शंकर गोडीवले, प्रभाकर गोडिवले, ओमकार राऊत, प्रवीण गोडीवले, राजेश गोडीवले, अजित गोडीवले, अनिल बोंबाले, नितीन गोडीवले, **(पान २ वर..)**

## आरएसएसचे पथसंचलन





**पनवेल : विजयादशमीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने रविवारी पथसंचलन करण्यात आले. शहरातील सिंधी पंचायत सभागृहापासून हे पथसंचलन सुरू झाले. पुढे पंचरत्न हॉटेल चौक, एमटीएनएल मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, भाजी मार्केट चौक, टपाल नाकामार्गे वीज मंडळ कार्यालयासमोरून कोळीवाडा येथील चौक, पंचरत्न हॉटेल चौकातून पुन्हा सिंधी पंचायत सभागृहाजवळ येऊन सांगता झाली. पथसंचलनादरम्यान नागरिकांनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले.**



**पनवेल : अन्याय, अहंकारी, पापी वृत्तीचे प्रतिक असलेल्या रावणाचे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित झंकार नवरात्रोत्सवात शनिवारी दहन करण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन सर्व नागरिकांना दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. येथे विजयादशमीनिमित्त रामलीला कार्यक्रम सादर झाला आणि महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत रावण दहन करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, उद्योजक विलास कोठारी, भाजप जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव यांच्यासह सोसायटी मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते.**

# रोह्यात पोलीस दलाच्या सशस्त्र मानवंदनेने धावीर महाराजांच्या पालखी सोहळ्यास प्रारंभ



**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांच्या पालखी सोहळ्यास रविवारी (दि. १३) सकाळी अत्यंत उत्साहात सुरुवात झाली. तत्पूर्वी रायगड पोलीस दलाने महाराजांना सशस्त्र सलामी दिली. या वेळी पोलीस दलाच्या बँड पथकाचे संचलनही झाले.

श्री धावीर महाराजांच्या मंदिरात सकाळी सहाच्या सुमारास पालखी आणण्यात आली. आरती झाल्यावर रायगड पोलीस दलाचे निरीक्षक विजय बाविस्कर यांच्या नेतृत्वाखालील दलाने सशस्त्र महाराजांना सलामी दिली व बँड पथकाने संचलन केले. त्यानंतर श्री धावीर महाराज की जय असा जयघोष करीत ढोल ताशा, खालुबाजा, बँड पथकाच्या साथीने पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. या सोहळ्यात नागरिक पारंपरिक वेशभूषा परिधान करून सहभागी झाले होते, तर विविध ठिकाणाहून आलेल्या भाविकांनी धावीर महाराजांची दर्शन घेतले.

या वेळी खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवळ, पोलीस उपविभागीय अधिकारी रवींद्र दौंडकर, श्री धावीर महाराज मंदिराचे विश्वस्त ॲड. प्रशांत देशमुख, मकरंद बारटक्के, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, समीर शेडगे, लालताप्रसाद कुशवाह, समीर सकपाळ, मयुर पायगुडे, राष्ट्रवादी सरचिटणीस विजय मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, नंदकुमार म्हात्रे, भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, तहसीलदार किशोर देशमुख, पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, नामदेव बंडगर, मुख्याधिकारी अजय एडके यांच्यासह मंदिराचे विश्वस्त, उत्सव समितीचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, नागरिक, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अष्टविनायक मंदिरांचा होणार जीर्णोद्धार

## ९२ कोटी १९ लाख रुपयांच्या आराखड्यास मंजुरी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्य सरकारने अष्टविनायक गणपती मंदिरांच्या ९२ कोटी १९ लाख रुपयांच्या जीर्णोद्धार आराखड्यास मंजुरी दिली असून, याबाबतचा शासन निर्णय वित्त व नियोजन विभागाने गुरुवारी जारी करण्यात आला आहे. यात रायगड जिल्ह्यातील पाली आणि महड येथील गणपती मंदिरांचा समावेश असून या दोन मंदिरांच्या जिर्णोद्धारासाठी २८ कोटी ८५ लाख रुपये खर्च केले जाणार आहेत.



तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत रायगड, पुणे आणि अहिल्या नगर जिल्ह्यांनी अष्टविनायक गणपती मंदिरांच्या जिर्णोद्धार करण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य सरकारला सादर केला होता. हा प्रस्ताव शासनाच्या मजुरीसाठी गेली दिड वर्ष प्रलंबित होता. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्याला मंजुरी देण्यात आली आहे. ९२ कोटी १९ लाख रुपयांच्या या प्रस्तावाला राज्य सरकारच्या वित्त व नियोजन विभागाने प्रशासकीय मंजुरी दिली आहे. त्यामुळे अष्टविनायक गणपती मंदिरांच्या जिर्णोद्धाराचा मार्ग मोकळा झाला आहे. याबाबतचा शासन निर्णय गुरुवारी काढण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील मोरगाव, थेऊर, ओझर आणि रांजणगाव, रायगड जिल्ह्यातील महड आणि पाली, तर अहिल्यानगर जिल्ह्यातील सिद्धटेक या अष्टविनायक गणपती मंदिरांचा जिर्णोद्धार या योजनेच्या माध्यमातून केला जाणार आहे. पुण्याचे विभागीय आयुक्त हे या जिर्णोद्धार कार्यक्रमाचे संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पहाणार आहेत. पुढील तीन वर्षांत म्हणजेच २०२७पर्यंत या सर्व मंदिरांच्या जतन व संवर्धनाची कामे पूर्ण केली जाणार आहेत. जिर्णोद्धारासाठी प्राथमिक अंदाजित खर्च हा ६२ कोटी ७१ लाख रुपये एवढा अपेक्षित असून, इतर अनुशंगिक खर्च २५ कोटी ७१ लाख रुपये इतका खर्च अपेक्षित असणार आहे.

अष्टविनायक गणपती जिर्णोद्धार कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील पाली येथील बल्लाळेश्वर गणपती मंदिर आणि महड येथील वरद विनायक देवस्थानांचा समावेश आहे. महड येथील वरद विनायक देवस्थानच्या जिर्णोद्धारासाठी १३ कोटी ९५ लाख रुपयांचा तर पाली येथील बल्लाळेश्वर मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी १४ कोटी ९० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दोन्ही मंदिरांच्या जिर्णोद्धारासाठी २८ कोटी ८५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

# मराठी भाषा भवनासह विविध प्रकल्पांचे भूमिपूजन आणि लोकार्पण

**मुंबई : प्रतिनिधी**

माय मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने आता मराठी भाषेचा डंका अधिक जोमाने सर्वत्र गाजणार आहे. मराठी भाषेच्या संवर्धन आणि विकासासाठी मुंबईत होत असलेले मराठी भाषा भवन उत्तम आणि दर्जेदार व्हावे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



जवाहर बालभवन परिसर, चर्नी रोड (प.) येथे उभारण्यात येणाऱ्या मराठी भाषा भवनचे भूमिपूजन आणि बृहन्मुंबई महानगरपालिका विकास निधी तथा मुंबई शहर जिल्हा अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना यातून होणाऱ्या विविध विकास कामांचे भूमिपूजन, लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.

समारंभास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहूल नार्वेकर, शालेय शिक्षण आणि मराठी भाषा मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सिद्धीविनायक ट्रस्टचे अध्यक्ष आमदार सदा सरवणकर, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मराठी भाषा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय.ए. कुंदन, अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी, जिल्हाधिकारी संजय यादव, ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक, मराठी भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख आदी उपस्थित होते.

# रोहा रेल्वेस्थानक सुशोभिकरणाचे भूमिपूजन

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा रेल्वेस्थानकात प्रवासी सुविधा व सुशोभिकरणासाठी एमआयडीसीच्या माध्यमातून ३२ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाचे भूमिपूजन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे. माजी आमदार अनिकेत तटकरे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादी सचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, तालुकाध्यक्ष विनोद पाशीलकर, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, महेश कोलटकर, महेंद्र दिवेकर, सूर्यकांत वाघमारे, फैसल अधिकारी, उदय शेलार यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

खासदार तटकरे यांनी, आगामी काळात स्थानकात लांब पल्ल्याच्या गाड्या अधिकृत थांबण्यासाठी प्रयत्न करीत जास्तीत जास्त रेल्वे सेवा देण्यासाठी दिल्लीमध्ये पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन दिले. माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यांनी, रोहेकारंसाठी सुसज्ज हॉस्पिटल व रेल्वे सुशोभीकरण केल्याबद्दल आभार मानले.

# देशभरात आरटीआयच्या चार लाखांहून अधिक तक्रारी प्रलंबित

**मुंबई : प्रतिनिधी**

माहितीचा अधिकार (आरटीआय) कायदा २००५ला १९ वर्षे पूर्ण झाली आहेत. एका अहवालात देशभरातील २९ माहिती आयोगांमधील चार लाखांहून अधिक केसेस प्रलंबित आहेत.

आरटीआय कार्यकर्त्या अंजली भारद्वाज यांच्या नेतृत्वाखाली नागरी समाज समूह सतर्क नागरिक संघटनेने तयार केलेल्या अहवालात असे दिसून आले आहे की ३० जून २०२४पर्यंत देशभरातील विविध माहिती आयोगांमध्ये एकूण ४,०५,५०९ प्रकरणे प्रलंबित आहेत. महाराष्ट्रात सर्वाधिक १,०८,६४१ प्रलंबित तक्रारी आहेत. त्यामागोमाग कर्नाटकात ५०,०००, तामिळनाडू ४१,२४१ आणि छत्तीसगडमध्ये २५,३१७ आहेत.

अहवालानुसार, ३१ मार्च २०१९पर्यंत २६ माहिती आयोगांमध्ये प्रलंबित प्रकरणांची संख्या २,१८,३४७ होती. जून २०२२ मध्ये ही संख्या ३ लाखांच्या पुढे गेली आणि आता ती ४,०५,५०९ वर पोहोचली आहे. १ जुलै २०२३ आणि ३० जून २०२४ दरम्यान, २७ आयोगांनी २,३१,४१७ अपील आणि तक्रारी नोंदवल्या आणि २८ आयोगांनी २,२५,९२९ प्रकरणांचे निराकरण केले.

# महाराष्ट्रातील पहिले थ्रीडी पोस्ट ऑफिस होणार पुण्यात

**पुणे : प्रतिनिधी**

आधुनिक आणि थ्रीडी तंत्रज्ञानाचा वापर करून महाराष्ट्रातील पहिले थ्रीडी टपाल पोस्ट ऑफिस पुण्यामध्ये उभे राहणार आहे. यासाठी जागा निश्चित करण्यात आली लवकरच कामाला सुरुवात होईल.



टपाल ऑफिसच्या पुणे शहर पश्चिम विभागाच्या प्रवाराधिक्षक रिपन ड्युलेट यांनी पत्रकार परिषदेत शुक्रवारी (दि.११) ही माहिती दिली.

शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन टपाल कार्यालयाने उपनगरांमध्ये नवीन टपाल कार्यालये सुरू केली आहेत. या वर्षभरातही आंबेगाव, बावधन, शिजानीनगर, सहकारनगरमध्ये नवीन टपाल कार्यालये सुरू होत आहेत. यातील सहकारनगरला ४११०७२ हा नवीन पिनकोड मिळाला आहे. तिथे पोस्टाची स्वत:ची जागा असल्याने पुण्यातील पहिले थ्रीडी प्रकारातील पोस्ट ऑफिस बांधण्यात येणार आहे.

या बांधणी प्रक्रियेत आधुनिक थ्रीडी प्रिटिंगचा वापर केला जातो. आधुनिक डिझाईन पद्धतीने वास्तूचा आकार निश्चित करून कमी दिवसांत ही इमारत उभी राहते. भारतात ही संकल्पना नवीन असून बेंगळूरूमध्ये गेल्या वर्षी टपाल कार्यालयाची पहिली इमारत बांधण्यात आली, असे रिपन यांनी सांगितले.

# कर्जत शहरात होणार आगरी समाज भवन

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात ८४ गावांमध्ये आगरी समाज वसला आहे. या समाजाचे आगरी भवन आता शहरात उभे राहणार आहे. आगरी समाजाच्या कार्यकर्त्यांनी जमीन उपलब्ध करून दिली आहे, असा विश्वास आमदार थोरवे यांनी शिष्टमंडळाला दिला.



कर्जत शहरात आगरी समाज भवन उभे राहावे यासाठी कर्जत तालुक्यातील शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते असलेल्या आगरी समाज संघटनेच्या आजीव सभासद, कार्यकर्त्यांनी कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेतली.

नियोजित भेटीमध्ये आमदार थोरवे यांना आगरी समाजाचे कार्यकर्त्यांनी निवेदन सादर केले. त्याच वेळी कर्जत शहरात उपलब्ध झालेल्या जमिनीची कागदपत्रदेखील दाखवली.

या वेळी आमदार महेंद्र थोरवे यांनी, आगरी समाजाचे कार्यकर्त्यांना तुम्ही आठ दिवस उशिरा आलात. आधी आला असता तर आपण कर्जत शहरात आगरी समाज भवनाच्या कामाचे भूमिपूजन केले असते, असे स्पष्ट केले, मात्र उशिरा का होईना, मात्र कर्जत शहरात नियोजित जागेवर उभ्या राहणाऱ्या आगरी समाजभवनसाठी एक कोटींचा निधी देण्यासाठी आपण तत्काळ राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना उद्याच पत्र देणार आहोत.

आदिवासी भवनाबरोबर आगरी भवन उभारण्याच्या कामाची प्रशासकीय मान्यता मिळवण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन दिले.

या वेळी आगरी समाजाचे शिवराम बदे, सुनील रसाळ, मनीषा दळवी, सज्जन गवळी, नील मुने, कुमार रुठे, कैलाश भालेकर, साईनाथ मुने, विवेक तरे, रामचंद्र कांबेरे, सागर रुठे, सुशांत दळवी आदी उपस्थित होते.

# वाहतूक पोलिसांची कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि.१२) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ३२३ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ८२ हजार ५०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे बेदरकार वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# ॐ श्री साई राम पदयात्रा मंडळातर्फे उरण ते शिर्डी पदयात्रा

**उरण : बातमीदार**

येथील ॐ श्री साईराम पदयात्रा मंडळातर्फे अखंडपणे नित्यनेमाने श्री साई मंदिर अंबिकावाडी ट्रस्टी जनार्दन घरत हे उरण ते शिर्डी अशी पदयात्रा काढतात. यंदाचे पदयात्राचे २४वे वर्ष असून १३ ते २१ ऑक्टोबर या कालावधीत उरण ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.



मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, साईभक्त उरणमधून शिर्डीकडे रवाना झाले आहेत. साईबाबांचे नामस्मरण करीत भक्तीगीत गात हे पदयात्री २१ ऑक्टोबर रोजी शिर्डीत पोहोचणार आहेत. त्यानंतर २४ ऑक्टोबर रोजी सायं. ५ ते १० या वेळेत श्री साई मंदिर, अंबिकावाडी नागाव उरण येथे श्री साई भंडाराचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ४ वाजता श्रींच्या चरण पादुका, पालखी पूजन, काकड आरती, पुढील प्रस्थान, दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती व श्री साई चरित्र अध्याय पारायण, दुपारी ३ वाजता ॐ श्री साईनाथाय नमः मंत्राचा जप व पुढील प्रस्थान, सायंकाळी ६:३० वाजता धूप आरती, ६:३० ते ८ भजन कीर्तन भारूड प्रवचन असा पदयात्रेतील दैनंदिन कार्यक्रम आहे.

पदयात्रा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष संदीप ठाकूर, उपाध्यक्ष लक्ष्मीकांत पाटील, सचिव विजय घरत, उपसचिव गणेश पाटील, खजिनदार हिम्मत पाटील, दत्तात्रेय भोईर, भजनप्रमुख कपिल म्हात्रे, पालखीप्रमुख उमेश भोईर, दीपक म्हात्रे, खानपान छाया म्हात्रे, मधुकर पाटील, नागूबाई घरत, शांताताई संजय भोईर, महिला हरिपाठ मंडळ प्रमिला घरत, नयना नाईक, सल्लागार जनार्दन घरत, बळीराम गायकवाड, हरिभाऊ नाईक तसेच सर्व पदयात्री, साईभक्त मेहनत घेत आहेत.

पान १ वरुन

## पाच वर्षात केलंय त्यापेक्षा दुप्पट काम करून दाखवणार –आमदार महेश बालदी

पंकज गोडिवले, दीपक शिर्के, मिलिंद शिर्के, अशोक गोडीवले, समीर पाटील, शेखर कोरडे, पियुष जितगरे, मंगेश गावळे, सुनील गोडीवले, शंकर वाघ, पेमेंद्र गोडीवले, जितेंद्र जाधव, अमर गोडीवले, लक्ष्मण शिंदे, आकाश शिर्के, मिलिंद शिर्के आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

मागच्या आमदारांनी काहीच काम केले नाही. त्यामुळे मला प्रत्येक घटकासाठी काम करण्याची संधी मिळाली. आदिवासीवाड्यांमध्ये रस्ता उपलब्ध करून देण्याचे भाग्य मिळाले असल्याचे उद्गार आमदार महेश बालदी यांनी काढले.

या वेळी जांभिवलीमधील शिवसेना उबाठा पक्षाचे उपशाखाप्रमुख समीर कोंडीलकर, माजी सदस्य मंदा टकले तसेच भाजपचे नागेश निरगुडा यांच्या नेतृत्वाखाली घेरा माणिकगडमधील नारायण निरगुडा, शुक्र्या वारगुडा, मंगळ्या वारगुडा, मोहन निरगुडा, महादू वारगुडा, मंगळ्या निरगुडा, किसन पाथांगे, गोविंद शीद, परशु निरगुडा यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत करण्यात आले.



**पनवेल : धर्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त येथे भाजपचे अनुसूचित जाती मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, उपाध्यक्ष महेश पाटील, भाजप सुकापुर अध्यक्ष राजेश पाटील, सरचिटणीस उदय म्हसकर, ज्येष्ठ नेते हनुमंत खुंटले, अनुसूचित जाती मोर्चा सुकापूर सरचिटणीस प्रितेश मोरे, ग्रामपंचायत सदस्य प्राची अमित जाधव, गटप्रतिनिधी ५७चे प्रमोद सावंत, बोधजन पंचायत समिती शाखा ७३५ सरचिटणीस चंदू कांबळे, मनोहर भोपी, सुनील पवार, हितेंद्र सणस, अंकुश पवार, महेंद्र जाधव, भाजपचे सुकापुर युवा मोर्चा अध्यक्ष तथा बुद्धविहार कमिटी प्रमुख महेश केणी यांनी भेट दिली.**

# सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेला प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोची बहुप्रतिक्षित योजना माझे पसंतीचे सिडकोचे घर या योजनेला नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर सुरू झालेल्या या योजनेच्या पहिल्या २४ तासांतच १२,४०० ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्जदारांना या सोडतीसाठी ११ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटासाठींच्या या योजनेचे उद्घाटन करण्यात आले. योजनेचे संकेतस्थळ https:‹S>‹S>. cidcohomes.com असून नागरिक या योजनेस उत्तम प्रतिसाद देत आहेत.

नवी मुंबईच्या विविध नोड्समध्ये ही ६७००० घरांची महायोजना साकारली जात असून, या गृहनिर्माण योजनेतील पहिल्या टप्प्यांतील २६००० घरे ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहेत. या योजनेतील प्रकल्पांचा विकास सिडकोच्या परिवहनकेंद्रित विकास तथा ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंट या संकल्पनेवर केंद्रित असून, या योजनेत साकारली जाणारी सर्व घरे ही संबंधित नोड्समधील रेल्वे स्थानके, बसस्थानके व मेंट्रो स्थानकांच्या जवळच बांधण्यात आली आहेत. याशिवाय अतिशय अत्याधुनिक बांधकाम तंत्राचा वापर करून विकसित केलेल्या या योजनतील गृहसंकुले सर्व प्रकारच्या पायाभूत व सामाजिक सोयीसुविधांनीयुक्त आहेत. या महायोजनेच्या नोंदणीला लाभत असलेल्या भरघोस प्रतिसादावरून सिडकोने गृहनिर्माणाच्या क्षेत्रात दिलेल्या भरीव योगदानावर जनतेने पुन्हा एकदा केलेले शिक्कामोर्तब केले आहे.

### *या सोडतीची वैशिष्ट्ये*

***** ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटांसाठी असून प्रधानमंत्री आवास योजनेच्या अनुदानाचा लाभही घेता येईल.***

***** या सोडतीशी संबंधित सर्वप्रकारच्या अर्जप्रक्रिया या सोप्या सुलभ ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत.***

***** याेजनेविषयी सर्वप्रकारची माहिती सिडकोच्या https:‹S>‹S>. cidcohomes.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.***

***** अर्जदारांना याजनेशी संबंधित सर्वप्रकारची माहितीसाठी सिडकोच्या वरील संकेतस्थळावरील योजना पुस्तिकेत मिळणार आहे.***

# पनवेलमध्ये ज्येष्ठाला लाखोंचा गंडा

## गुगलवर बँकेचा हेल्पलाईन नंबर शोधणे पडले महाग

**पनवेल : वार्ताहर**

गुगलच्या माध्यमातून बँकेचा हेल्पलाईन नंबर शोधण्याच्या प्रयत्नात असलेल्या ६७ वर्षीय रिटायर्ड व्यक्तीला सायबर चोरट्याने बँकेचा कर्मचारी असल्याचे भासवून, तसेच त्यांना मदत करण्याचा बहाणा करत त्यांच्या बँक खात्यातून ४.५४ लाख रुपये दुसऱ्या खात्यात वळते करून घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात सायबर चोरट्या विरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेले ज्येष्ठ नागरिक अशोक सक्सेना (वय ६७) पनवेलमध्ये कुटुंबासह राहण्यास आहेत. त्यांना तक्का भागातील एसबीआय बँकेत काम असल्याने ते बँकेच्या नंबरवर संपर्क साधत होते, मात्र बँकेकडून त्यांना कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी गुगलवरुन एसबीआय बँकेचा हेल्पलाईन नंबर शोधण्याचा प्रयत्न केला. याचदरम्यान एका सायबर चोरट्याने सक्सेना यांना संपर्क साधून एसबीआय बँकेचा कर्मचारी असल्याचे भासवत त्यांना मदत करण्याचा बहाणा केला. त्यानंतर सायबर चोरट्याने सक्सेना यांना बोलण्यात गुंतवून त्यांना मोबाईल फोनवर युनो ॲपमध्ये तो सांगेल त्या पध्दतीने अपडेट करण्यास सांगितले. त्यानंतर सक्सेना यांनी सायबर चोरट्यावर विश्वास ठेवून तो सांगेल, त्याप्रमाणे युनो ॲपमध्ये माहिती भरण्यास सुरुवात केली. याचदरम्यान सायबर चोरट्याने सक्सेना यांच्या खात्यातून ४.५४ लाख रुपये दुसऱ्या बँकेत वळती करून घेतली. याबाबचा मेसेज सक्सेना यांच्या मोबाईलवर आल्यानंतर त्यांनी सायबर चोरट्याकडे त्याबाबत विचारणा केली, मात्र त्याने थातुरमातूर उत्तर देऊन सक्सेना यांना गुंतवून ठेवले. त्यानंतर सायबर चोरट्याने सक्सेना यांच्या पाच लाखांची फिक्स डिपॉझिट मोडून त्यातील ३.७५ लाख रुपये काढून घेण्याचा प्रयत्न केला.

याबाबतचा मेसेज सक्सेना यांच्या मोबाईलवर आल्यानंतर पुन्हा त्यांनी सायबर चोरट्याकडे त्याबाबत विचारणा केली. याहीवेळी त्याने खोटे कारण सांगून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सक्सेना यांना संशय आल्यानंतर त्यांनी तत्काळ आपला फोन बंद करुन टाकला.

यानंतर त्यांनी बँकेत जाऊन चौकशी केली असता, त्यांच्या खात्यातून ४.५४ लाख रुपयांची रक्कम दुसऱ्या खात्यात वळती झाल्याचे सांगण्यात आले, मात्र एफडीमधील रक्कम बँकेतच असल्याचे त्यांना बँकेकडून सांगण्यात आले. त्यानंतर सक्सेना यांनी नवी मुंबई सायबर पोलिसांकडे ऑनलाईन तक्रार केली. नंतर त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## केवायसी अपडेटच्या बहाण्याने खात्यातून १२.७७ लाखांचा अपहार

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमध्ये राहणाऱ्या विवाहितेला अज्ञात सायबर चोरट्याने बँक खाते बंद करण्यात येत असल्याची भिती दाखवत तसेच केवायसी अपडेट करण्याबाबतची लिंक पाठवून त्याच्या बँक खात्यातून तब्बल १२.७७ लाखांची रक्कम परस्पर दुसऱ्या खात्यात वळती केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली ५२ वर्षीय विवाहिता खारघर, सेक्टर-२१ मध्ये कुटुंबासह राहण्यास आहे. १ ऑक्टोबर रोजी दुपारी १.४५ वाजण्याच्या सुमारास विवाहितेला सायबर चोरट्याने ॲक्सिस बँकेचा कर्मचारी असल्याचे भासवून त्यांना संपर्क साधला होता तसेच त्यांचे केवायसी अपडेट नसल्याचे सांगून केवायसी अपडेट करण्यास सांगितले. अन्यथा त्यांना ३५०० रुपये दंड भरावा लागेल आणि त्यांचे खाते बंद करण्यात येईल, अशी भिती दाखवली. त्यानंतर सायबर चोरट्याने या विवाहितेला केवायसी अपडेट करण्यासाठी एक लिंकसुध्दा पाठवून दिली. लिंक उघडून विवाहितेने आपली संपूर्ण माहिती त्यात भरली. त्यानंतर सायबर चोरट्याने त्यांना २४ तासात त्यांचे खाते अपडेट होईल, असे सांगितले. त्यानंतर सायबर चोरट्यांनी या विवाहितेकडून घेतलेल्या माहितीचा वापर करुन दुसऱ्या दिवशी सायंकाळी त्यांच्या खात्यातून १२.७७ लाख रुपये दुसऱ्या खात्यात वळते करून घेतले.

याबाबतचे मेसेज विवाहितेच्या मोबाईलवर आल्यानंतर त्यांनी बँकेच्या कस्टमर केअर वर संपर्क साधला. त्यानंतर सायबर चोरट्यांनी त्यांच्या खात्यातून सदरची रक्कम दुसऱ्या खात्यात वळती केल्याचे आणि त्यामुळे त्यांचे खाते फ्रिज करण्यात आल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर या विवाहितेने प्रथम सायबर क्राईमच्या १९३० या हेल्पलाईनवर पार केली. त्यांनतर त्यांनी खारघर पोलीस तक्रार दाखल केली.

# बेकायदेशीर फलक हटविले

## पनवेल महापालिकेची कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात बेकायदेशीर फलकविरोधात विशेष मोहीम करण्याचे आदेश आयुक्त मंगेश चितळे यांनी दिल्यानंतर रविवारी (दि.१३) पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर या चारही प्रभागामध्ये सहायक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली युध्द पातळीवर बेकायदेशीर फलक काढण्यात येत आहेत.

बेकायदशीर फलक हटवण्याबाबत सुस्वराज्य फाऊंडेशन या संस्थेने केलेल्या मूळ याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर बुधवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी सुनावणी झाली. या वेळी उच्च न्यायालयाने बेकायदशीर फलक हटवण्यासाठी १० दिवसांची विशेष मोहीम हाती घेण्याचे आदेश राज्यातील सर्व महापालिका व नगर परिषदांना न्यायालयाने दिले होते. त्यानूसार आयुक्तांच्या निर्देशानूसार पनवेल महापालिका हद्दीतील पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर या चारही प्रभागामध्ये सहायक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली अनधिकृत फलक काढण्यात येत आहेत.

या बेकायदेशीर फलक हटविण्याच्या विशेष मोहिमे दरम्यान मोठे होर्डिंग/बैनर, किआॅस्क-युनिपोल होर्डिंग (वीज/दूरध्वनी/सिग्नल चे खांब यावरील),झेंडे, झाडावरील बैनर/पोस्टर्स, कमानी, अनधिकृत लाईटच्या माळा, रस्त्यामधील मंडप, डिव्हायडरमध्ये उभे केलेले कटाउट्स, इतर फलक काढण्यात येत आहेत.

### प्रभागनिहाय मोहीम

***दुपारच्या सत्रात खारघर प्रभाग अ मध्ये सुमारे ४४ व नावडे उपविभागांमध्ये ३४ बेकायदेशीर फलक काढण्यात आले, पनवेलमध्ये ५६ अनधिकृत फलक काढण्यात आले, प्रभाग समिती कामोठे अंतर्गत १८ पोस्टर, ७३ बॅनर, ६ कमानी यांच्यावर दुपार पर्यंत कारवाई करण्यात आली तसेच कळंबोलीमध्ये सुमारे १५० अनधिकृत फलक काढण्यात आले.***



**कामोठे : सचिन भालेकर व सागर भालेकर यांच्या कामोठे सेक्टर २१, प्लॉट नं ७१ येथील मंगलमूर्ती लंच होम आणि भाकरी सेंटर या व्हेज आणि नॉन व्हेज आगरी कोळी पद्धतीच्या जेवणाच्या हॉटेलचे उद्‌घाटन माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी दिलीप म्हात्रे, मयुर फडके आदी उपस्थित होते.**



**उलवे नोड : शेलघर सेक्टर १६ येथील ग्रामस्थ मंडळाच्या दसरा गणपतीचे भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. या वेळी प्रमोद भगत, नितेश भगत आदी उपस्थित होते.**

# टायर बदलताना ट्रकची धडक; दोघे जखमी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुणे-मुंबई एक्स्प्रेस वेवर कारचे पंक्चर ट्यूबलेस टायर बदलत असताना ट्रकने दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाले. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

लव लक्ष्मण भगत हे कोळीवाडा, कल्याण वेस्ट येथे राहत असून ११ ऑक्टोबर रोजी एकविरा देवीच्या दर्शनासाठी ते त्यांच्या मित्रांसह सुझुकी कंपनीची एर्टिगा कार (एमएच ०४ एचएक्स ९६८४) घेऊन टिटवाळा येथून बाहेर पडले. एकविरा देवीचे दर्शन घेऊन रात्री साडे दहाच्या सुमारास ते परत निघाले असता पुणे मुंबई एक्सप्रेस वेने जात असताना किरण जाधव गाडी चालवत होता. एक्सप्रेस वेवर जात असताना देवद गावाजवळ कारचे ड्रायव्हर साइडच्या पाठीमागील चाक पंक्चर झाले. त्यामुळे गाडी चौथ्या लेनवर थांबवली. स्टेपनी बाहेर काढली असता त्यात हवा कमी असल्याचे दिसून आले. त्यामुळे स्टेपनी आहे त्या ठिकाणी फिट केली.

अंदाजे दोन वाजता सुरेंद्र आग्रहरी आणि लव भगत हे दरवाजा जवळ गेले असता मालवाहतूक ट्रकने दोघांना ठोकर मारून भरधाव वेगाने न थांबता निघून गेला. यात दोघेही जखमी झाले त्यांना एमजीएम हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले.

# आदई परिसराच्या विकासासाठी भाजप कटीबद्ध -अरुणशेठ भगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



### विकासकामांचा भूमिपूजन सोहळा

पनवेलच्या विकासाचे शिल्पकार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीमधून विकासकामांचा झंझावात सुरू आहे. त्याअंतर्गत आदई गावातील ६० लाख रुपयांच्या विकासकामांचा भूमिपूजन सोहळा शनिवारी (दि.१२) झाला. या कामांचा शुभारंभ भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाला असून भाजप या परिसराचा विकास करण्यासाठी कटीबद्ध आहे, अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक आमदार निधीमधून आदईमधील अष्टविनायक गृह संकुल ते बालाजी रेसीडेंन्सि गेट, ओमकार पुरम गेट ते अष्टविनायक गृह संकुल, आई गावदेवी मंदिर ते प्रयाग यश सोसायटी गेट आणि सत्यज्योत सोसायटी गेट ते पुष्पविनायक सोसायटी गेट पर्यत्तच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. याकामांचे भूमिपूजन भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.



या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, सरचिटणीस भुपेंद्र पाटील, दशरथ म्हात्रे, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, जोमा शेळके, रामा पाटील, माजी सरपंच महादू शेळके, जगदीश शेळके, पद्माकर शेळके, ग्रामपंचायत सदस्य श्रीचन भंडारी, राजेश काकडे, जनार्दन पाटील, रोहित पाटील, किरण शेळके, तेजस म्हात्रे, सत्या खाडे, राम शेळके, सुरज पाटील, राहुल पाटील, कैलास पाटील, ज्ञानेश्वर पाटील, एकर्ना शेळके, श्रीधर शेळके, अशोक पाटील आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात






### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

६८वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा शनिवारी (दि.१२) साजरा झाला. यानिमित्त पनवेल शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेकडर भवनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन आयोजित तसेच भारतीय बौद्ध महासभा बौद्धजन पंचायत समिती, बौद्धधम्म प्रचार प्रसार समिती, त्रिरत्न बौद्ध महासंघ, यांच्या संयुक्त विद्यमाने ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन धम्मचक्रप्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच आपल्या वाटचालीमध्ये आपण जी काही काम करण्याची संधी माझ्यावर सोपवाल ती पार पाडेल, अशी ग्वाही दिली. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. प्रकाश बिनेदार, भारतीय बौद्ध महासभेचे रायगड जिल्हाध्यक्ष काशिनाथ कांबळे, उरण तालुका अध्यक्ष कल्पेश कांबळे, बौद्धजन पंचायत समितीचे अध्यक्ष विजय गायकवाड, अम्मचारी कमलशुद्धी, मच्छिंद्र कांबळे, अनिल जाधव, सुनिल वाघपंजे, अजय जाधव, सि.के.बाबरे, राहूल गायकवाड, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, खांदा कॉलनीमधील बौद्धविहारामध्येही हा धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमालाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, मनोहर म्हात्रे, ॲड. प्रकाश बिनेदार, दिपक मोरे, काशिनाथ कांबळे, राहुल पारगावकर, भिमराव पोवार, मोतीलाल कोळी, चंद्रसेन कांबळे, कविता वाघ, सुरेखा वाघमारे, महेंद्र कांबळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# वन्यजीव सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांना पशू-पक्ष्यांबद्दल माहिती



**उरण : बातमीदार**

वन्यजीव प्रेमी व्यक्तिमत्त्व राजू मुंबईकर यांच्या माध्यामातून आणि कर्नाळा पक्षीअभयारण्य वनपरिक्षेत्र वनविभाग आणि उरण वनपरिक्षेत्र वनविभाग यांच्या आयोजनातून २ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर या दरम्यान वन्यजीव साप्ताह साजरा करण्यात आला. त्या अनुषंगाने राजू मुंबईकर यांच्या व्याख्यानरुपी प्रबोधनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्राणी-पक्षी, वन्यजीवांबद्दल माहिती देण्यात आली.

सलग सात दिवस आपटे प्राथमिक शाळा, पोसरी प्राथमिक शाळा,पी.पी. मुंबईकर इंग्लिश मीडियम स्कूल रानसई प्राथमिक शाळा, पी.पी. खारपाटील हायस्कूल चिरनेर, कल्ले प्राथमिक शाळा या सात शाळांतील विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या प्राणी-पक्षी आणि वन्य जीवांबद्दलची उपायुक्त अशी माहिती देत आपल्या व्याख्यानरुपी प्रबोधनात्मक कार्यक्रमातून जनजागृती केली.

कर्नाळा पक्षी अभयारण्य वनपरिक्षेत्र वनविभाग आणि उरण वनपरिक्षेत्र वनविभाग यांच्या आयोजनातून आणि राजू मुंबईकर यांनी वन्यजीव साप्ताहानिमित्त सादर केलेल्या व्याख्यानरुपी प्रबोधनात्मक कार्यक्रमा द्वारे सर्वशाळांतील विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वन्यजिवांबद्दल प्राणी-पक्षांबद्दल उपायुक्त अशी माहिती देत लुप्त होत चाललेल्या आणि जंगलातील नामशेष होणाऱ्या वन्य जीवांच्या बद्दल चिंतादेखील व्यक्त केली.

वन्यजीव साप्ताह निमित्त आयोजित कार्यक्रमाच्या माध्यामातून विविध शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये वन्य जीवांच्याबद्दलच्या जनजागृती सोबतच त्या शाळांतील विद्यार्थ्यांना वन विभागातील अधिकारी वर्गाच्या वतीने खाऊचेदेखील वाटप करण्यात आले.



**उरण : हिम्मतनगरी सार्वजनिक नवरात्री मंडळ, जासईच्या देवीचे विसर्जनापूर्वी आमदार महेश बालदी यांनी दर्शन घेतले. या वेळी त्यांचे मंडळाचे अध्यक्ष विशाल म्हात्रे यांनी स्वागत केले. आमदार महेश बालदींसोबत पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## संपादकीय

# दसरा मेळाव्यांतून संदेश

नवरात्रोत्सवाची सांगता शनिवारी विजयादशमी अर्थात दसऱ्याने झाली. यानिमित्ताने मुंबईसह राज्यात विविध ठिकाणी दसरा मेळावे झाले. यातून संबंधितांनी जोरकसपणे भाषणे करून भूमिका स्पष्ट केली. लवकरच विधानसभा निवडणूक होणार असल्याने ते अपेक्षितच होते.

**दसऱ्याला धार्मिक, आध्यात्मिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. चांगल्याचा वाईटावर विजय या भावनेतून दसरा मोठ्या उत्साहाने महाराष्ट्रासह देशभरात साजरा केला जातो. या सणाला राज्यात वैचारिक परंपराही आहे. मुंबई, भगवानगडावरील दसरा मेळावे, नागपुरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन आणि सरसंघचालकांचे मार्गदर्शन, धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम याची उत्सुकता दरवर्षी असते. यंदा मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनीही मेळावा घेतला. त्याचप्रमाणे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ऑनलाईन विचार मांडले. शिवसेनेत उठाव झाल्यापासून मुंबईत दोन दसरा मेळावे होऊ लागले आहेत. यापैकी एक मेळावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आझाद मैदानावर, तर दुसरा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा शिवाजी पार्कवर झाला. या वेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या भाषणात जोरदार फटकेबाजी केली. मार्मिकपणे भाष्य करत मेळावा गाजवला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर तर त्यांनी तुफान हल्लाबोल केला, टोले लगावले आणि चिमटेही काढले. मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आणि आनंद दिघेंचा चेला आहे. मला हलक्यात घेऊ नका. मी मैदानातून पळणारा नाही, तर पळवणारा आहे, असा इशारा त्यांनी दिला. महाराष्ट्र विरोधी आघाडीला घरी बसवून आपले सरकार आले तेव्हा हे सरकार १५ दिवसांत पडेल, एका महिन्यात पडेल, सहा महिन्यांत पडेल असे दावे केले जात होते, पण टीका करणाऱ्यांना हा एकनाथ शिंदे पुरून उरला. जनतेच्या आणि तुमच्या आशीर्वादाने व साथीने या सरकारने घासून, पुसून नाही तर ठासून दोन वर्ष पूर्ण केली. बाळासाहेबांचे विचार घेऊन आम्ही निघालो आहोत. काहींना हिंदू म्हणून घेण्याची लाज वाटत आहे. हिऱ्यापोटी जन्माला आलेल्या गारगोट्यांना हिंदू शब्दाची लाज वाटतेय, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी उद्धव ठाकरेंचे नाव न घेता त्यांचा समाचार घेतला. आज महाराष्ट्रात जिथे जिथे जातो तिथे सगळे जण हसत स्वागत करतात, आशीर्वाद देतात. दोन वर्षांच्या अगदी कमी काळात आपले सरकार लाडके सरकार झाले आहे, असा दावाही मुख्यमंत्री शिंदेंनी या वेळी केला. दुसरीकडे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांसह सत्ताधाऱ्यांवर टीका केली. यंदा युवा नेते आदित्य ठाकरे यांनीही मनोगत व्यक्त केले, मात्र ठाकरेंच्या भाषणात जोर नव्हता आणि तेच तेच मुद्दे व्यक्त झाले. त्या तुलनेत शिंदेंनी यंदा वैविध्य दाखवले. तत्पूर्वी बीडमध्येही यंदा दोन मेळावे झाले. त्यापैकी भगवानगडावर ओबीसी नेत्या आमदार पंकजा मुंडे यांनी वंचित, दलित, बहुजनांच्या उद्धारासाठी शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहण्याची ग्वाही दिली, तर नारायणगडावर मराठा समाजासाठी मनोज जरांगे पाटील यांनी हुंकार व्यक्त केला. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी आमच्या सर्व मागण्या मान्य व्हाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नागपूरमध्ये शतकोत्तर वर्षात पदार्पण करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी सोहळ्यात सरसंघचालक मोहन भागवत यांनी समाजातील विकृतीवर आसूड ओढले. या वेळी त्यांनी ओटीटी प्लॅटफॉर्मवरील कंटेंटवर चिंता व्यक्त केली, जी योग्यच आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनही नागपूर व मुंबईत साजरा करण्यात आला. यानिमित्ताने बौद्ध अनुयायांनी अभिवादन केले. अशा प्रकारे विजयादशमी उत्साहात साजरी झाली आणि दसरा मेळाव्यातून विविध संदेश देण्यात आले.**

# कर्जतकरांची पिण्याच्या पाण्याची चिंता मिटणार

**खबरबात**
विजय मांडे



कर्जतची वाढीव पाणीपुरवठा योजना २००६ साली पूर्ण झाली आणि कर्जत शहराच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला. हा विकास इतका जपट्याने होत गेला की, वाढीव पाणीपुरवठा योजनेचे पाणी कमी पडू लागले. त्यातच आता कर्जत–पनवेल रेल्वे सुविधा होत असल्याने कर्जतकडे स्थायिक होण्याचा कल वाढू लागला आहे.

आता पाणीपुरवठा करण्यावर मर्यादा आल्या आणि त्याच वेळी आमदार महेंद्र थोरवे यांनी कर्जत शहरासाठी ५७ कोटी रुपये खर्चाची नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर करून घेऊन तिचे दसऱ्याच्या मुहूर्तावर भूमिपूजन सुध्दा केले. ही योजना तीस वर्षांच्या लोकसंख्येवर आधारित असल्याने आता अडीच तप तरी कर्जतकरांची पिण्याच्या पाण्याची चिंता मिटणार आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळवून ७५ वर्षे झाली तरीही आदिवासी दुर्गम भागातील पाण्याची टंचाई दूर झाली नाही. कर्जत तालुक्यात काही आदिवासी भगिनींना हंडाभर पाण्यासाठी विहिरींवर मुक्काम करण्याची वेळ येत आहे. तालुक्यात योजनांचा सुकाळ आहे पण नियोजनांचा दुष्काळ असल्याने महिलांवर ही पाळी आली आहे. जल जीवन मिशनच्या माध्यमातून तालुक्याच्या दुर्गम भागात १२९ योजनांचे काम सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पाणी टंचाई दूर होईल असे वाटते. कर्जत नगर परिषद स्थापन होऊन तीस वर्ष होऊन गेली. पाणी योजनांचे राजकारण बावीस वर्ष चालले होते. त्यातून सुटका झाल्यानंतर कर्जत शहरासाठी पाणी योजना नव्याने करण्यात आली, मात्र पाण्याची मुबलक उपलब्धता झाल्याने कर्जतचा विकास अपेक्षेपेक्षा दुप्पट वेगाने झाल्याने सध्या सुरू असलेली पाणी योजना कमी पडत असल्याने नगर परिषद हद्दीतील महिलांना पावसाळ्यातही पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ येत आहे.

कर्जत ग्रामपंचायत असताना आपापल्या प्रतिष्ठेसाठी पळसदरी तलावाच्या की पेज नदीच्या पाण्यावर पाणी योजना करायची? असा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळी राजकीय पक्षांमध्ये प्रचंड मतभेद होते. अगदी आंदोलने, उपोषणे झाली. अखेर सरकारी दरबारी जाऊन त्यावर तोडगा काढण्यात आला व एकोणीस गावांसाठी पेज नदीची योजना व कर्जत ग्रुप ग्रामपंचायतीतील कर्जत, मुद्रे (बुद्रुक), मुद्रे (खुर्द), भिसेगाव व गुंडगे या गावांसाठी पळसदरी या रेल्वेच्या पाण्यावर योजना करण्याची मंजुरी देण्यात आली. या योजनेचे पाणी कर्जत ग्रामपंचायतीतील गावांना पुरेसे पडत नव्हते. त्यामुळे विकासक कर्जतला फिरकत नसत. या पाण्याच्या नळाद्वारे कधी छोटे छोटे मासे तर कधी लहान वांबी, पण नळाद्वारे आल्याचा अनुभव अनेक ग्रामस्थांना त्यावेळी आला होता.

पाणी योजना मंजूर झाली होती सात टक्के कामही झाले मात्र १९९९ साली राज्यात सत्ता बदल झाल्याने नवीन सरकारच्या धोरणामुळे या योजनेचे काम पुन्हा सुरू झाले नाही. २००६ साली एका वृत्तपत्राच्या प्रतिनिधीने ही बावीस वर्षांची रखडलेली पाणी योजना प्रत्यक्षात आणण्याचे ठरविले आणि त्याने कर्जतच्या नागरिकांना बरोबर घेऊन तीन–चार पाणी मेळावे घेतले. यामध्ये एकमेकांची तोंडे न बघणाऱ्या लोकप्रतिनिधी व राजकीय पक्षांच्या नेत्यांना एकत्रित बोलवून हे तिन्ही मेळावे यशस्वी झाले. या जन रेट्याने सरकार दरबारी दखल घेण्यात आली आणि पाणी योजनेचे काम पुन्हा सुरू झाले. ही योजना पूर्ण व्हावी म्हणून वृत्तपत्र प्रतिनिधीने तब्बल सात वर्षे पाठपुरावा केला. २००६ – २००७ साली योजना पूर्ण झाली. या योजनेचे पाणी कर्जतमध्ये आल्यावर विजयी पाणी मेळावा करून ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे ऋण व्यक्त करण्यात आले. असे असले तरी या योजनेचे पाणी घरोघरी सुरू झाले मात्र आज सोळा – सतरा वर्ष झाली तरी आद्यप या योजनेचे उदघाटन कर्जत नगर परिषदेने केले नाही. ही एक ऐतिहासिक बाब म्हणावी लागेल.

कर्जतकरांना पुरेसे व स्वच्छ पाणी मिळू लागल्याने विकासक कर्जतकडे येऊ लागल्याने कर्जतचा विकास होऊ लागला तो इतक्या झपाट्याने झाला की २०३१ साला पर्यंत असलेली ही पाणी योजना २०२१ सालापासूनच अपुरी पडू लागली. आत्ता तर टोकाच्या भागाला पाणीच मिळत नाही त्यामुळे अनेकांनी पाणी येण्यासाठी पंप लावले त्यामुळे ज्यांनी पंप लावले नाहीत त्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. काहींनी तर नळ जोडणी घेताना नगर परिषदेचे कर्मचारी न आणता आपल्या मर्जीतील खासगी प्लम्बर आणून हवी तशी नियमबाह्य जोडण्या घेऊन पाणी घेतले आहे. त्यामुळे अन्य नागरिकांनी पंप लावूनही त्यांना पाणी मिळत नाही. याबाबत नगरपरिषदे मध्ये तक्रारी अर्ज देऊनही अद्याप कारवाई करण्यात आली नाही.

कर्जत नगर परिषद हद्दीसाठी नवीन पाणी योजना मंजूर झाली पाहिजे. सध्या जे पाणी मिळते त्याचा नियमित पणा नाही. कधी सकाळी आठ वाजता तर कधी रात्री आठ वाजता पाणी मिळते. जेथून पाणी उचलले जाते तेथील वीजपुरवठा खंडित होत असतो अशी कारणे सांगितली जातात. नगर परिषदेने यावर उपाय म्हणून जनरेटर सुद्धा घेतले आहे, पण डिझेल परवडत नाही म्हणून त्याचा वापर करण्यात येत नाही. त्यामुळे नागरिकांना नेहमीच त्रास सहन करावा लागत आहे. आमदार महेंद्र थोरवे यांनी नवीन पाणी योजनेसाठी प्रयत्न सुरू केले. ५७ कोटी रुपयांची पाणी योजना मंजूर करण्यात त्यांना यश आले. मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी तांत्रिक बाबींचा पाठपुरावा करून योजना मंजुरी साठी महत्त्वाचे काम केले. माजी नगरसेवक संकेत भासे, पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख अभिमन्यू एलवांडे यांनी सुध्दा पाठपुरावा करण्यासाठी सहकार्य केले.

या योजनेचे भूमिपूजन दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर करण्यात आले. ही योजना तीस वर्षाच्या लोकसंख्येवर आधारित आहे. योजना पूर्ण होण्यास अठरा महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. ही पाणी योजना सर्व बाबींचा विचार करून केली आहे. कर्जत तालुक्यात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे पाणी पुरवठा करण्याचे नियोजन कोलमडते. या योजनेत तब्बल साडे तीन कोटी रुपये खर्च करून एक्स्प्रेस फिडर वंजारवाडी आणि दाहीवली येथील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत आणण्यात येणार आहे. त्यामुळे पाणीपुरवठा पुरेसा व नियोजनबध्द होईल. यामध्ये आनंदाची गोष्ट अशी की मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी भूमिपूजन झाल्यावर लगेचच एक्स्प्रेस फिडरचे काम ठेकेदाराला हाती घ्यायला सांगितले आहे.

हे काम तीन ते चार महिन्यात पूर्ण होईल. त्यामुळे २००६ साली झालेल्या पाणी पुरवठा योजनेला त्याचा फायदा होईल आणि जुन्या योजनेचे पाणीही वेळेवर मिळेल, मात्र या एक्स्प्रेस फिडरवरून त्या परिसरात असलेल्या बड्या धेंडांच्या फार्म हाऊस किंवा रिसॉर्टला देऊ नये म्हणजे सारे सुरळीत होईल. एकंदरीत कर्जतकरांची तीस वर्षांची म्हणजेच अडीच तपांसाठी पिण्याच्या पाण्याची चिंता मिटणार आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# आता वेगाने व्हायरल होणार तुमची रील!

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब ॲप युजर्सना आकर्षित करतात. फोटो पोस्ट करणे, स्टोरीवर गाणे लावणे, रील पाहणे, लाइव्ह जाणे आदी बरीच फीचर्स युजर्ससाठी या ॲप्सवर उपलब्ध असतात. तसेच इन्स्टाग्रामवरचे रील फीचर हळूहळू फेबसबुक व ट्विटरवरसुद्धा सुरू झाले, पण इन्स्टाग्रामव्यतिरिक्त कोणत्याही दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर एक मिनिटापेक्षा जास्त मोठी रील अपलोड करता येत नव्हती, पण आता यूट्यूब इन्फ्लुएन्सर, कन्टेन्ट क्रिएटरसाठी खास काहीतरी घेऊन आले आहे.



यूट्यूब त्यांच्या शॉर्ट्स फीचरवर एक खास अपडेट आणत आहे; जे क्रिएटर्सना तीन मिनिटांपर्यंतचे व्हिडीओ अपलोड करण्याची परवानगी देईल. १५ ऑक्टोबर २०२४पासून हा बदल अमलात येईल. त्यामुळे युजर्सचा YouTube Shorts वर कन्टेंट तयार करण्याचा आणि तो वापरण्याचा अनुभव बदलणार आहे.

आधी युजर्स यूट्यूब शॉर्ट्स (YouTube Shorts) लहान आणि फास्ट व्हिडीओवर लक्ष केंद्रित करीत होते, जे साधारणपणे एक मिनिटाच्या आत असायचे. या लहान व्हिडीओंमुळे यूट्यूबला TikTok आणि Instagram Reels सारख्या इतर प्लॅटफॉर्म्ससोबत स्पर्धा करण्यात मदत झाली, पण आता यूट्यूब लाँग व्हिडीओला सपोर्ट करणार आहे तसेच या व्हिडीओमुळे पूर्वी अपलोड केलेल्या व्हिडीओवर परिणाम होणार नाही आणि यूट्यूब युजर्सच्या आवडीनुसार त्यांना लाँग शॉर्ट्स शोधण्यास मदत होईल.

आगामी महिन्यात आणखी एक अपडेट येणार आहे, ज्यामध्ये यूट्यूबवरील कन्टेंट शॉर्ट्समध्ये मिक्स केले जाईल. कन्टेंट क्रिएटर्सना लवकरच विविध यूट्यूब व्हिडीओंमधून म्युजिक व्हिडीओंसह क्लिप्स वापरण्याची संधी मिळेल, ज्यामुळे ते त्यांचे शॉर्ट्स (YouTube Shorts) अधिक आकर्षक बनवू शकतील. या फीचरमुळे क्रिएटर्सना अधिक क्रिएटिव्हिटी दाखविता येईल आणि यूट्यूबशी जोडण्याची संधी मिळेल. तसेच, Google DeepMindचा प्रगत व्हिडीओ मॉडेल, तशे हे या वर्षीच्या अखेरीस शॉर्ट्समध्ये समाविष्ट केले जाणार आहेत, जे क्रिएटर्सना अधिक पॉवरफुल व्हिडीओ बॅकग्राऊंड, स्टॅण्डअलोन क्लिप ऑफर करील. तर असे बदल येत्या काळात यूट्यूब शॉर्ट्समध्ये तुम्हाला दिसून येतील.

# भारतीय क्रिकेटपटू गौतम गंभीर

गौतम गंभीर यांचा जन्म १४ ऑक्टोबर १९८१ रोजी झाला होता. त्याचे वडील दीपक गंभीर हे कापड व्यापारी असून आईचे नाव सीमा आहे. गौतमला एकता नावाची एक छोटी बहीण आहे, जी त्याच्यापेक्षा दोन वर्षांनी लहान आहे. त्यांच्या जन्माच्या केवळ १८ दिवसानंतर, आजोबा आणि आजी त्यांना वाढवण्यासाठी त्यांच्याबरोबर घेऊन गेले आणि तेव्हापासून ते एकत्र आहेत.

गंभीरने वयाच्या दहाव्या वर्षी क्रिकेट खेळायला सुरुवात केली. त्यांनी मॉर्डन स्कूल, नवी दिल्ली आणि नंतरचे शिक्षण हिंदू कॉलेजमध्ये पूर्ण केले. ते ९०च्या दशकात आपल्या काका पवन गुलाटी यांच्या घरी राहत होते आणि त्यांना आपला गुरू मानतात. कोणत्याही महत्त्वाच्या सामन्यापूर्वी अनेकदा ते त्याला कॉल करतात. त्यांना दिल्लीच्या लाल बहादूर शास्त्री अकॅडमीचे राजू टंडन आणि संजय भारद्वाज यांनी प्रशिक्षित केले. २००० साली त्यांची बंगळुरूमध्ये राष्ट्रीय क्रिकेट अकादमीसाठी निवड झाली.

गौतम गंभीर हा डाव्या हाताचा सलामीवीर फलंदाज आहे जो दिल्लीकडूनही घरगुती क्रिकेट खेळतो आणि आयपीएल संघ कोलकाता नाइट रायडर्सचा कर्णधारही आहे. २००३मध्ये त्याने बांगलादेशविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि त्यानंतरच्याच वर्षी त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिला कसोटी सामना खेळला. २०१० ते २०११दरम्यान त्याने इंटरनॅशनल सामन्यांमध्ये भारतीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघाचे नेतृत्वही केले आहे, त्याच्या नेतृत्वात भारताने ६ सामन्यांत ६ सामने जिंकले. २००७ वर्ल्डकपच्या दोन्ही फायनल्समध्ये भारताने जिंकलेला २००७ वर्ल्ड टी–२० (५४ चेंडूत ७५ धावा) आणि २०११ क्रिकेट विश्वचषक (११२ चेंडूत ९७ धावा) महत्त्वपूर्ण खेळी खेळल्या. २००८मध्ये त्याला भारताचा दुसरा सर्वोच्च क्रीडा पुरस्कार अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००९मध्ये आयसीसी कसोटी क्रमवारीत तो जगातील नंबर एकचा फलंदाज ठरला. त्याच वर्षी त्याला आयसीसी टेस्ट प्लेअर ऑफ द इयर पुरस्कारही देण्यात आला.



**निमित्त**

इंडियन प्रीमियर लीगच्या पहिल्या खेळाडूंच्या लिलावात एक वर्षासाठी दिल्ली डेअरडेव्हिल्स फ्रँचायझीने गंभीरची निवड केली होती, ज्याची किंमत ७२५,००० अमेरिकन डॉलर्स आहे. त्याने पहिल्या सामन्यात १४ सामन्यांत ५३४ धावा करून दुसऱ्या सर्वाधिक धावा केल्या. २०१०च्या आयपीएल हंगामात त्याला दिल्ली डेअरडेव्हिल्सचा कर्णधार म्हणून बढती देण्यात आली. स्पर्धेच्या शेवटी दिल्ली डेअरडेव्हिल्सचा तो एकमेव खेळाडू होता, जो आयपीएलमध्ये १०००हून अधिक धावा करू शकला.

२०११च्या आयपीएलच्या लिलावात गंभीरला सर्वाधिक पसंती देण्यात आली होती. गंभीरच्या नेतृत्वात कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएलच्या प्लेऑफसाठी पात्रता मिळविली आणि चॅम्पियन्स लीग ट्वेंटी–२०मध्ये प्रथमच प्रवेश केला. अखेरीस त्याने चेन्नईच्या घरच्या मैदानावर चेन्नई सुपर किंग्जचा ५ गडी राखून पराभव करून चॅम्पियन्सला पहिले जेतेपद मिळवून दिले. गंभीर कोलकाता नाईट रायडर्सचा अग्रगण्य धावा करणारा खेळाडू आहे. त्याच मोसमात त्याने आपल्या संघाकडून एकूण नऊपैकी सहा अर्धशतके झळकावली आणि २००० धावांचा टप्पा पार करून स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाची नोंद करणारा आयपीएल इतिहासातील दुसरा खेळाडू ठरला. तो खासदारही होता आणि आता भारतीय पुरुष क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक आहे. **(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : सलग सुट्टीमुळे समुद्रकिनारी पुन्हा पर्यटक दिसू लागले आहेत. कडक उन्हातही लाटांचा आनंद घेत आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# काजू, बदाम की अक्रोड शक्तीशाली ड्रायफ्रूट कोणते?



ड्रायफ्रूट प्रत्येक वातावरणात खाल्ले जाते, परंतु हिवाळ्यात ड्रायफ्रूट खाणे अधिक चांगले आहे. ड्रायफ्रूटमध्ये प्रोटीन, व्हिटामिन, कॅल्शियम, पोटेशियम, फायबर, झिंक आणि इतर खनिज मुबलक प्रमाणात असतात. काजू, बदाम, आणि अक्रोड यांच्यापैकी कोणते ड्रॉयफ्रूट अधिक फायदेशीर आहे.

काजू, बादाम आणि आक्रोड यांच्यात मुलबक पोषक तत्व असतात. ऑल इंडिया इंस्टीट्यूट ऑफ मेडिकल सायन्सच्या मुख्य डायटीशियन डॉ. परमीत कौर काजू खाण्यास अनेक जण प्राधान्य देतात. त्यातच काजूवर प्रक्रिया करुन म्हणजे मसालेदार काजू खाल्ले जातात, परंतु साधे काजू खाणे अधिक चांगले आहे.

काजूमध्ये सर्वाधिक प्रोटीन, व्हिटामिन ई, मिनरल, कॉपर, एंटी ऑक्सीडेंट्स, आयरन, फाइबर, कॅल्शियम, झिंक, मॅग्नीशियम असते.

बदामात फायबर, कॅल्शियम, मँगनीज, फॉस्फोरस, कॉपर, आयरन, पोटेशियम, राइबोफ्लेविन असते. ते शरीरासाठी अधिक पोषक असते.

आक्रोडमध्ये ओमेगा–३, ओमेगा–६ फॅटी एसिड, व्हिटामिन्स असते. प्रोटीन, कॅल्शियम, आयरन, फॉस्फोरस, कॉपर, सेलेनियम, मिनरल्स, कार्बोहाइड्रेट्स, फायबरसुद्धा आक्रोडमध्ये असते. फक्त दोन, तीन आक्रोड खाल्यावर शरीरास मुबलक पोषक तत्व मिळतात. नियमित आक्रोड खाल्यानंतर रोग प्रतिकारक क्षमता वाढते.

डॉ. परमीत कौर म्हणतात, तिन्ही ड्रॉयफ्रूट आपल्या ठिकाणी श्रेष्ठ आहे. त्यानंतर त्यांच्यात तुलना केल्यास आक्रोड सर्वश्रेष्ठ ड्रायफ्रूट आहे. यामुळे डॉक्टर आक्रोड खाण्याचा सल्ला देतात. दुसऱ्या क्रमांकावर बदाम आहे. काजूचा क्रमांक तिसरा आहे.

सामान्य व्यक्ती रोज ६–८ बादाम, २–३ आक्रोड आणि ४–५ काजू खाऊ शकतो. त्यापेक्षा जास्त खाल्यास पचण्यासाठी अवघड आहे. हिवाळ्यात ड्रॉयफ्रूट असेच खाऊ शकतात, परंतु उन्हाळ्यात खाताना ते रात्री भिजवून सकाळी खावे.

# रोहे शहरावर सीसीटीव्हीची करडी नजर

## मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते कंट्रोल रूमचे लोकार्पण





**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीत १०० सीसीटीव्ही महत्त्वाच्या ठिकाणी लावण्यात आले असून याचे लोकार्पण महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते शनिवारी (दि.१२) सायंकाळी करण्यात आले. त्यामुळे रोहा शहरावर सीसीटीव्हीची करडी नजर राहणार असून गुन्हेगारीला आळा बसण्यासाठी मदत होणार आहे. यांसह पोलिसांना त्यांच्या तपासात सहकार्य होणार आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) निधी अंतर्गत रोहा शहरात विविध ठिकाणी सिसिटीव्ही कॅमेरे लावणे, कंट्रोल रूम उभारणे व अनुषंगिक सुविधा तयार करणे या कामाचे लोकार्पण ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी माजी आमदार अनिकेत तटकरे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, रोहा पोलीस उपविभागीय अधिकारी रवींद्र दौंडकर, रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, नगर परिषद मुख्याधिकारी अजयकुमार एडके, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, महेश कोलटकर, राजेंद्र जैन, अहमद दर्जी, मयूर दिवेकर, पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

रोहा अष्टमी नगर परिषद व रोहा पोलीस ठाणे अंतर्गत २९ ठिकाणी रोहा शहरात १०० कॅमेरे बसविण्यात आले असून त्याचे मॉनेटरिंग रोहा पोलीस ठाणे येथ देण्यात आले आहे.

एकूण चार स्कीनवर प्रत्येकी २५ कॅमेरे देण्यात आले आहे. चार पीटीझेड कॅमेरे छायाचित्रण करतात व चार एएनपीआर कॅमेरे गाड्यांचे रंग व मॉडेल, नंबरप्लेट दर्शविण्याचे काम करतात.

लोकार्पण झाल्यानंतर महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सीसीटीव्ही कंट्रोल रूमची पाहणी केली. या वेळी माजी आमदार अनिकेत तटकरे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र दौंडकर व पोलीस निरीक्षक देविदास मुपडे सोबत होते.

**हनुमान टेकडी व या परिसरात सुशोभीकरण झाल्यानंतर या ठिकाणीसुद्धा सीसीटीव्ही बसवण्यात येणार आहे. याचे मॉनिटरिंग रोहा पोलीस ठाण्यात देण्यात येणार आहे.**

**–आदिती तटकरे**, महिला व बालकल्याण मंत्री

**शहरात सीसीटीव्ही बसवल्यामुळे गुन्हेगारीला आळा बसणार असणार आहे. त्याचबरोबर पोलिसांना तपासात सहकार्य होणार आहे.**

**–सोमनाथ घार्गे**, पोलीस अधीक्षक, रायगड

---

**निवडक**

### भागोजीबुवा डवले यांना पुरस्कार



**माणगाव** : तालुक्यातील नाईटणे गावचे सामाजिक कार्यकर्ते भागोजीबुवा बेंडू डवले यांना उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा विधिमंडळ पक्षप्रतोद आमदार भरतशेठ गोगावले यांच्या हस्ते समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भागोजीबुवा डवले यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. भागोजीबुवा डवले हे नाईटणे कुणबी समाजाचे साले ग्रुपचे अध्यक्ष आहेत. समाजात गेली अनेक वर्षे सामाजिक बांधिलकी व जातीय सलोखा राखून ते काम करीत असल्याने बहुजन समाजात त्यानी आपली विशेष अशी ओळख निर्माण केली आहे. कुणबी समाजाचे ते नेते असून समाजाचा उन्नतीसाठी ते विशेष प्रयत्नशील असतात.

### ‘लायन्स’तर्फे वॉटर प्युरिफायरचे वाटप



**रेवदंडा** : ऑक्टोबर सेवा सप्ताहाचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ अलिबागच्या सौजन्याने वॉटर प्युरिफायरचे वाटप करण्यात आले. मुरूड तालुक्यातील मांडला, वळके तसेच बोर्ली या केंद्रातील एकूण ३० शाळांमध्ये सेकंड डिस्ट्रिक्ट व्हॉइस गव्हर्नर प्रवीण सरनाईक, साईट फर्स्टचे डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन एस. एन. मूर्ती, अलिबाग लायन अध्यक्ष अ‍ॅड. गौरी म्हात्रे यांच्या हस्ते वॉटर प्युरिफायर शिक्षकांच्या ताब्यात देण्यात आले. या वेळी प्रमुख उपस्थितांमध्ये सचिव महेश कवळे, खजिनदार अंकिता म्हात्रे, फर्स्ट व्हीपी प्रदीप नाईक, डिस्ट्रिक्ट चेअरमन कम्युनिटी सर्व्हिस गिरीश म्हात्रे, अविनाश राऊळ, अतुल वर्तक, महेंद्र पाटील, संतोष पाटील, संजय मोरणकर, मनोज ढगे, प्रकाश देशमुख, चित्रा वर्तक, केंद्रप्रमुख सुनील पाटील, सुधीर नाईक यांच्यासह शिक्षक आणि लायन्स परिवाराची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### धारेवाडी येथील तरुण शिवसेनेत दाखल

**कर्जत** : तालुक्यातील अंजप ग्रामपंचायतीमधील धारेवाडी येथील तरुण कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केला. पोसरी येथे झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात शिवसेना उत्तर जिल्हाप्रमुख संतोष भोईर, कर्जत विधानसभा संघटक शिवराम बदे, युवा विधानसभा प्रमुख प्रसाद थोरवे, शिवसेना उपतालुका प्रमुख रामचंद्र मिणमिणे, विभाग प्रमुख पंढरीनाथ आगज, मंदार थोरवे, अविनाश थोरवे आदी उपस्थित होते. या वेळी धारेवाडीमधील सुरेश जैतू भगत, एकनाथ भगत, आंबो पारधी, जगदीश कडाळी, बाळू निरगुडा, रवींद्र निरगुडा, यशवंत निरगुडा, विशाल कातवारा, मनोहर भगत, अरुण पारधी, मंगळ भगत, किशोर पारधी, हरिश्चंद्र भगत, नरेश निरगुडा, रामदास पारधी, योगेश पारधी, प्रवीण पारधी, काशिनाथ भगत, संजय कडाळी आणि इतरांनी शिवसेनेत प्रवेश केला.



---

## वाघोली येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी सभागृह




**नागोठणे : बातमीदार**

अलिबाग तालुक्यातील कामार्ले विभाग वाघोलीच्या ज्येष्ठ नागरिक संस्थेने सुमारे ६० लाख रुपये खर्चून टुमदार वास्तू उभारली आहे. या वास्तूचे लोकार्पण आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आमदार दळवी यांनी वैयक्तिक सहा लाख रुपये या संस्थेला दिले तसेच ज्येष्ठांना बसण्यासाठी स्टीलचे पाच बेंचेस दिले जातील, असे आश्वासित केले.

या लोकार्पण सोहळ्यास ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर, अच्युत पाटील, सुधाकर पाटील, संस्थेचे अध्यक्ष दामोदर ठाकूर, उपाध्यक्ष नंदकुमार पाटील, सेक्रेटरी दत्तात्रेय नांदेकर, खजिनदार जनार्दन पाटील, मधुकर पाटील, प्रकाश पाटील, चंद्रकांत वालेकर, तसेच उद्योजक अनिल म्हात्रे, कीर्ती शहा, ग्रामविकास अधिकारी सौ. जायस्वाल, खिडकीचे माजी सरपंच वैभव पाटील, जिल्हा नियोजन समिती सदस्य संतोष निगडे, विजय पाटील, नारायण गायकवाड, ब. रा. वाघपंजे, सुनील डबरे, जयवंत थळे, शशिकांत कवळे, वसंत पाटील, पुष्पा पाटील, लीलाबाई पाटील, नंदा नांदेकर, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

---

## हाशाचीपट्टी आदिवासी वाडीसाठी रस्ता मंजूर



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानच्या पश्चिमेला असलेल्या हाशाचीपट्टी या आदिवासीवाडीसाठी धोदाणी गाव येथून कायमस्वरूपी रस्ता तयार करण्यास मान्यता मिळाली असून वनविभागानेसुद्धा हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे हाशाचीपट्टी या वाडीपर्यंत डांबरी रस्ता होणार असून ही वाडी आता विकासाच्या प्रवाहात सहभागी होणार आहे.

माथेरान पर्यटनस्थळाच्या मागील बाजूस पश्चिमेला हाशाचीपट्टी ही आदिवासीवाडी आहे. ही आदिवासीवाडी पनवेल वनक्षेत्रामध्ये येते. पनवेल तालुक्यातील मालडुंगे ग्रामपंचायत हद्दीतील चिंचवाडी ते खालापूर तालुक्यात असणारी हाशाचीपट्टी रस्त्यासाठी ग्रामस्थांनी मागील पाच दशकांपासून मागणी केली होती. या रस्त्यासाठी क्षेत्र ०:६० हेक्टर वनक्षेत्र मागणी होती. त्यानुसार चिंचवाडी ते हाशाचीपट्टी रस्त्यासाठी धोदानी जुने नाव मालडुंगा, पनवेल येथील राखीव वनजागेतून वनक्षेत्र समावेश करून या वनक्षेत्रातून जाणाऱ्या रस्त्याचे काम करण्यासाठी सुमारे चार कोटी अंदाजपत्रक प्रस्तावित आहे. या नवीन मार्गामुळे ट्रेकर्ससाठी माथेरानपर्यंत पोहोचणे सोयीचे होणार आहे.

१९६५मध्ये धोदानी–माथेरान या रस्त्याला मंजुरी मिळाली होती, परंतु हा रस्ता शासनाच्या लालफितीमध्ये आजही अडकला असून त्यानंतर मागणी करून हाशाचीपट्टी या वाडीचा रस्ता मंजूर झाला आहे. त्यामुळे माथेरानलाही पर्यायी रस्त्याच्या आशा आता पल्लवित झाल्या असून माथेरानच्या पर्यटनास चालना मिळणार आहे. हाशाचीपट्टी रस्त्याच्या कामांकरिता वनक्षेत्रमध्ये सुमारे दोन हजार मीटर लांबीचा व तीन मीटर रुंदीची मर्यादा घालून देण्यात आली आहे. या प्रकल्पामध्ये ४४ वृक्षांची तोड होणार असून त्यास मंजुरी देण्यात आली आहे. या मंजुरीदरम्यान वृक्षतोडीचे बदल्यात दुप्पट झाडे लावणे बंधनकारक आहे.

---

## ‘सणांचे महत्त्व सांगण्याची जबाबदारी जुन्या पिढीची’



**मुरूड : प्रतिनिधी**

सण, पारंपरिक उत्सव समाजजीवन सुखी करण्यासाठी साजरे होत असतात. कालप्रवाहात या सणांचे विकृतीकरण होऊ पाहात आहे. तेव्हा नव्या पिढीला शुद्ध स्वरूपात त्याचे महत्त्व सांगण्याची जबाबदारी जुन्या पिढीने स्वीकारावी, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोकण प्रांत सेवा विभागप्रमुख विवेक भागवत यांनी केले.

मुरूड येथे विजयादशमीनिमित्त आयोजन पथसंचलनाच्या समारोपप्रसंगी भागवत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

या वेळी तालुका संघचालक संजय ठाकूर, जिल्हा कार्यवाह अनुप सिंह, मुख्यशिक्षक समीर उपाध्ये यांनी शस्त्रपूजन केले. हिंदू बोर्डिंग येथून एकदरा पूल, श्रीराम भवन, आझाद चौक, सार्वजनिक वाचनालय, गणेश आळी नाका, मारुती मंदिर चौकमार्गे हिंदू बोर्डिंगमध्ये समारोप करण्यात आला.

---

## पोलादपूरच्या श्री काळभैरवनाथ देवस्थानासाठी ५० लाखांचा निधी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

विजयादशमीच्या मुहूर्तावर आमदार प्रवीण दरेकर यांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला पोलादपूरच्या श्री काळभैरवनाथ देवस्थानासाठी ५० लाखांच्या निधीतून सुशोभिकरणाचा शुभारंभ करण्यात आला.

या वेळी नगराध्यक्ष सोनाली गायकवाड, भाजपचे रायगड उपाध्यक्ष जयवंत दळवी, महाडचे माजी नगराध्यक्ष संदीप ठोंबरे, भाजप शहरअध्यक्ष राजाभाऊ दिक्षित, शिवसेना शहरप्रमुख सुरेश पवार, कृउबा संचालक लक्ष्मण मोरे, अर्थ आणि नियोजन सभापती अंकिता निकम, भाजयुमोचे अध्यक्ष महेश निकम, समाधान शेठ, प्रतिक पवार, महिला आघाडीच्या अध्यक्षा माई शेठ, उपाध्यक्षा तनुजा भागवत, उज्ज्वला पालांडे शेठ, सपना बुटाला, रश्मी दिक्षित, महिला बालकल्याण सभापती अस्मिता पवार, आरोग्य व पाणी सभापती प्रसाद इंगवले, महायुतीतील मनसेचे शहराध्यक्ष दर्पण दरेकर, उपाध्यक्ष मुश्ताक मुजावर, नरेश शेलार, माजी नगराध्यक्ष बच्चू तथा राजन पवार, कोतवालचे उपसरपंच राजेश कदम तसेच देवस्थानचे सरपंच बाबूराव महाडीक, उपाध्यक्ष ज्ञानदेव पार्टे, दिनेश पाटील, सुधीर चित्रे तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

नामदेव शिंदे यांनी, माजी अध्यक्ष प्रसन्ना पालांडे यांनी याकामी विशेष मेहनत घेतल्याचे सांगितले. रायगड उपाध्यक्ष जयवंत दळवी यांनी, आमदार प्रवीण दरेकर यांच्या मनात कायम विचार सुरू असतात. प्रत्येकवेळी पोलादपूरला झुकते माप त्यांनी दिले आहे, असे सांगितले. या वेळी कृउबा संचालक लक्ष्मण मोरे यांनीही मनोगत व्यक्त केले.





---



**श्रीवर्धन : बोर्लीपंचतन येथील शितळादेवी व दसरा गणपतीची मोठ्या उत्साहात गुलालाच्या उधळण करीत डीजेच्या तालावर भक्तीमय वातावरणात विसर्जन मिरवणूक काढण्यात आली होती.** (छाया : अमेय नाझरे)

---

## फातिमा मातेची तीर्थयात्रा उत्साहात

**कर्जत** : कर्जतमध्ये ८९वी फातिमा मातेची तीर्थयात्रा उत्साहात झाली. देश–विदेशांतून आलेल्या भाविकांनी मातेचे दर्शन घेतले.



चर्चचे प्रमुख फादर जॉय डिसिल्वा यांच्या उपस्थितीत फादर नेईल दोस संतोस यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी सिल्व्हर फ्रान्सिस, पॉल फ्रान्सिस, अ‍ॅड. सनी डिमेलो, विल्सन पानपाटील, विक्टर मास्करेन्स, जेम्स जेकब, पेन्सर, नेल्सन फ्रांसिस, सुरेंद्र अंची, फ्रान्सिस जेनिफर, शाविओ फ्रान्सिस, जेनिफर फ्रान्सिस, संगीता भोईर, सिमरन फ्रान्सिस आदींसह ख्रिश्चन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. ज्याचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

मिळकतीचे वर्णन

**मौजे- उसर्ली बुद्रुक, ता पनवेल व जिल्हा रायगड**

| गट क्रमांक/सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | भोगवटादार | क्षेत्र हे. आर. चौ.मी | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १९ | २ | श्रीमती. नेत्रप्रभा गुलाब भोपी | ०-०९-०० | १.७४ |
| | | श्री. दिलीपकुमार फतेहलाल खेरोदिया | ०-२१-०० | ४.०७ |
| | | एकूण | ०-३०-०० | ५.८१ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकत रजिस्टड पोस्टाने दाखल करावीत. याप्रमाणे, मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :१४/१०/२०२४

**सही /-**
**अ‍ॅड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
२०३, मोहिनील अपार्टमेंट,
नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड
पिन कोड- ४००७०२
मोबाईल नं. ७६६६०१०२९३

# उलवेत नवीन पोलीस ठाण्याला मंजुरी

## आमदार महेश बालदी यांचा पाठपुरावा यशस्वी

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबई परिसराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्याशिवाय मोठमोठे उद्योग, व्यवसाय, गृहनिर्माण प्रकल्प तसेच विमानतळदेखील नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात होत आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाची हद्द दिघा ते पनवेल, उरणपर्यंत पसरलेली आहे, मात्र आता वाढत्या लोकसंख्या पाहता यात एनआरआय सागरी पोलीस ठाणे, न्हावाशेवा पोलीस ठाणे व पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या ताण कमी करण्याकारिता उलवे पोलीस ठाण्याला मंजुरी दिली आहे. यासाठी आमदार महेश बालदी यांनी पाठपुरावा केला होता.

सद्य:स्थितीत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत २ परिमंडळ येतात. त्यात नवी मुंबई शहरात परिमंडळ १ तर पनवेल व उरण शहरासाठी परिमंडळ २ अशी विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक परिमंडळात १० पोलीस ठाणी ४




सहाय्यक आयुक्त कार्यालय येतात. सध्या नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत २० पोलीस ठाण्यांचा समावेश आहे.

नवी मुंबई शहरात येणारे मोठमोठे प्रकल्प, आंतरराष्ट्रीय विमानतळ, न्हावा शिवडी लिंक रोड, विरार अलिबाग कॉरिडोअर होत आहेत. प्रस्तावित उलवा पोलीस ठाणे परिसरात मोठमोठ्या नागरी वस्ती, महत्त्वाचे प्रकल्प, रेल्वेस्थानके इ. आस्थापन सुरू आहेत तसेच या परिसरात अंदाजे १,६०,००० इतकी लोकसंख्या झालेली आहे. वाढत्या लोकवस्तीमुळे गुन्हेगारीत वाढ होत असल्याने कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी सध्याच्या पोलीस ठाण्यांवर ताण पडत आहे. त्याचबरोबर अटल सेतू व शिवाजीनगर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा कोस्टल रोड असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढत आहे. या प्रस्तावित उलवे पोलीस ठाणेचा परिसर एनआरआय सागरी पोलीस ठाणे, न्हावाशेवा पोलीस ठाणे व पनवेल शहर पोलीस ठाणे या तीन पोलीस ठाण्यांच्या हद्दीत समाविष्ठ आहे त्यामुळे नागरिकांना आपल्या तक्रारी, पासपोर्ट, चारित्र्य पडताळणी या नागरी सेवांसाठी अडचणींना सामोरे जावे लागते.

या बाबी विचारात घेऊन पोलीस महासंचालक (नि.व.स), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ रोजींच्या पत्राद्वारे पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर एनआरआय पोलीस ठाणे, न्हावाशेवा पोलीस ठाणे व पनवेल शहर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन सुसज्ज उलवा पोलीस ठाणे निर्माण करण्यास व त्याकरीता येणाऱ्या दोन कोटी १२ लाख ३० हजार रुपये इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला होता.

हा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन होता. त्यानुसार एन. आर. आय. सागरी पोलीस ठाणे, न्हावाशेवा पोलीस ठाणे व पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या ताण कमी करण्याकारिता उलवे पोलीस ठाण्याला गृह विभागाने मान्यता दिली आहे. तसे आदेश गृह विभागाचे उपसचिव रा.ता. भालवने यांनी काढले आहेत.

# उरण नगर परिषदेतील कंत्राटी कामगारांचे किमान वेतन वाढणार

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर, बातमीदार**

उरण नगर परिषदेमधील सर्व गरीब-गरजू कंत्राटी कर्मचाऱ्यांना आता मासिक वेतन रक्कम १० हजारांच्या ऐवजी रक्कम १८ हजार रुपये मिळणार आणि मागील चार महिन्यांतील वाढीव पगार थकबाकीसह रक्कम लवकरच मिळणार आहे.

म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनच्या वतीने उरण नगर परिषदेमध्ये अनेक वर्षे असंघटीत असलेल्या अनुसूचित जातीचे, जमातीचे बहुतांश कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळावे, भविष्य निर्वाह निधी मिळावा, ईएसआयसी या आरोग्य योजनेचा लाभ, बोनस या मागण्या करण्यात



आल्या होत्या. या अनुषंगाने मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या दालनात कामगार नेते ॲड. सुरेश ठाकूर, अनिल जाधव आणि कामगार नेते संतोष पवार यांची कंत्राटदार श्री देशमुख यांच्यासमवेत बैठक झाली.

या बैठकीमध्ये मुख्याधिकारी समीर जाधव यांनी सकारात्मक भूमिका घेऊन येत्या काळात म्हणजेच दोन दिवसांत नवीन टेंडर प्रसिद्ध करणार असल्याचे ठरले आहे. यामध्ये आणि सध्यास्थीत अनेक वर्षांपासून कार्यरत उरण नगर परिषदेमधील सर्व गरीब-गरजू दलीत कंत्राटी कर्मचाऱ्यांना न्याय देणार तसेच या कंत्राटी कामगारांना एप्रिल २०२४पासून किमान वेतन, नियमाप्रमाणे ईपीएफ, ईएसआयसी आणि ८.३३ टक्के बोनस कंत्राटदाराने देणे बंधनकारक आहे.

# तरकसेंच्या कादंबरीला पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठी साहित्य मंडळ आयोजित सातवे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे तळेगाव दाभाडे येथील श्रीरंग कलानिकेतन सभागृहात मोठ्या उत्साहात साजरे झाले.

या साहित्य संमेलनात नवी मुंबई पोलीस दलातील अधिकारी तसेच ज्येष्ठ कवी, साहित्यिक उत्तम तरकसे यांच्या स्वकथनपर धुळीतून शिखराकडे या कादंबरीस क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी ॲड. राम कांडगे, ज्येष्ठ कवी सुरेश लोहार, डॉ. नेहा कुलकर्णी, डॉ. जयप्रकाश घुमटकर, सतीश साठे, श्रीकृष्ण पुरंदरे आदी उपस्थित होते.



# नेरूळमध्ये पुनर्बांधणी सदनिका नमुना फ्लॅटचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील दत्तगुरू को. ऑप. हौसिंग सोसायटी ली.च्या पुनर्बांधणी इमारतीमधील नमुना सदनिका फ्लॅटचे उद्घाटन आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

या सोहळ्याचे आयोजन नेरुळ सेक्टर ६ येथील नियोजित दत्तगुरु सोसायटीमध्ये करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर नवी मुंबई भाजप अध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, ज्येष्ठ नगरसेवक सुरज पाटील, माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे, माजी नगरसेविका सुजाता पाटील, सामाजिक कार्यकर्त्या गणेश भगत, यशवंत तांडेल, विकासक



कमलेश पटेल, शफिक भाटकर आदी उपस्थित होते.

प्रारंभी, आपल्या प्रस्ताविकात बोलताना स्थानिक माजी नगरसेवक सुरज पाटील यांनी सांगितले की, दत्तगुरू सोसायटीने सर्व खडतर प्रवास पार करून त्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होत आहे. भविष्याचा वेध घेऊन जनतेच्या विकासाचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या आमदार गणेश नाईक परिवाराकडे नवी मुंबईचे पालकत्व आपण दिल्यानेच हे शक्य झाले असून लवकरच घराचा ताबा आपणास मिळणार असल्याचे सुरज पाटील यांनी सांगितले.

या वेळी मार्गदर्शनपर बोलताना माजी मंत्री आमदर गणेश नाईक यांनी बोलताना सांगितले की, नवी मुंबईमध्ये वाशी येथे सर्वप्रथम पुनर्विकासाचे सोपस्कार पूर्ण करून पहिला टॉवर पूर्ण झाला. त्या सदनिकाधारकांना प्लॅट माझ्या हस्ते देण्यात आले. त्यानंतर रेरा कायद्याची पूर्णतः अंमलबजावणी करून नेरूळ येथील दत्तगुरू टॉवर उभारण्यात येत आहे. या कामात स्थानिक माजी नगरसेवक सुरज पाटील यांनी अतिशय पारदर्शक, स्वच्छ कारभार करत अतिशय देखणी वास्तू आकारात येत आहे याचा मला सार्थ अभिमान आहे. नवी मुंबईतील माझ्या विचारांच्या सहकाऱ्यांनी दुसऱ्याच्या आनंदात सुख आणि समाधान शोधले आहे, म्हणूनच आज मागील २५ वर्षे निर्विवादपणे शहरातील जनतेने माझ्या नेतृत्वाखाली विश्वास ठेवला आहे. कोणताही प्रकारचे व्यावसायिक हिते न पाहता आज ही वास्तू आकार घेत असून सर्व मूलभूत सुविधा इथं जनतेला मिळतील, असा विश्वास नाईक यांनी या वेळी व्यक्त केला.

या वेळी दत्तगुरु सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र बागल, सचिव राजकुमार पाटील, उपाध्यक्ष राजकुमार पुरी, खजिनदार तानाजी पाटील, अशोक आतकरी यासह दत्तगुरूमधील रहिवाशी, तसेच सारसोळे सेक्टर ६ येथील विविध सोसायटीमधील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारती विद्यापीठात अँटी रॅगिंग ओरिएन्टेशन प्रोग्रॅमला प्रतिसाद

**खारघर : प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ डेन्टल कॉलेज आणि हॉस्पिटल खारघर यांच्या माध्यमातुन गुरुवारी (दि.१०) प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'एन्टी-रॅगिंग' ओरिएंटेशन प्रोग्राम चे आयोजन करण्यात आले होते. या वेळी रॅगिंग ला बळी न पडता त्याविरोधात आवाज उठविण्याबाबत मार्गदर्शन प्रमुख वक्त्यांच्या माध्यमातुन करण्यात आले.

या वेळी ए.सी.पी.एम. डेन्टल कॉलेज धुळेचे प्रिन्सिपल व डेन्टल काऊन्सील ऑफ इंडिया से सदस्य डॉ.अरूण ददलानी, शाश्वत फाऊंडेशनच्या अध्यक्ष बीना गोगरी, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. जाई बापट व पनवेल रेल्वे पोलीसचे वरिष्ठ निरीक्षक जगताप सर,झाकीर शेख आदींनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. रॅगिंग चे परिणाम व त्यावर होणाऱ्या कायदेशीर कारवाई ह्या विषयावर डॉ ददलानी यांनी विद्यार्थ्यांचे



मार्गदर्शन केले.

डॉक्टर म्हणून आपण समाजासमोर काय आदर्श ठेवला पाहिजे ह्याविषयी बीना गोगरी यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करत रॅगिंग चा परिणाम हा फक्त रॅगिंगचा बळी होणाऱ्या विद्यार्थ्यावर च नव्हे तर त्याच्या कुटुबियांवर होत असल्याचे गोगरी यांनी सांगितले. रॅगिंगमुळे कॉलेजच्या रेटिंग आणि प्रतिष्ठेवरदेखील परिणाम पडत असल्याने हा अतिशय मोठा व अक्षम्य गुन्हा असल्याने ,सुरक्षित वातावरण इतर विद्यार्थ्यांसाठी निर्माण करणे ही देखील आपलीच जवाबदारी असल्याचे गोगरी यांनी आपल्या वक्तव्यातून सांगितले.

रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांच्या मनावर होणारे दुष्परिणाम व त्याचे निवारण ह्यावर डॉ.बापट यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. रॅगिंग संबंधि कायदे व पोलीस सहकार्य या संदर्भात पीएसआई जगताप व शेख यांनी विस्तृत माहिती दिली.

कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. व्ही. श्रीनिवासन यांनी सर्व वक्त्यांचे सन्मानपत्र देऊन आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन एन्टी रॅगिंग कमिटीचे संयोजक डॉ. उत्तम शेट्टी यांनी मान्यवरांचे आभार मानले.

# 'रोटरी'तर्फे गर्भवतींना पोषण आहाराचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी खारघर मिडटाऊनने खारघरमधील एका खेडेगावात २० टीबी रुग्ण आणि २० गर्भवतींना पोषण आहार आणि प्रथिने पूरक आहार दान केले.

हा कार्यक्रम जिल्हा क्षयरोग अधिकारी सचिन जाधव, क्लबचे अध्यक्ष आरटीएन शैलेश पटेल, प्रथम महिला दिपा पटेल, सेवा प्रकल्प संचालक आरटीएन डॉ. रविकिरण, आयपीपी आरटीएन अनुप गुप्ता आणि क्लबचे इतर वरिष्ठ सदस्य यांच्या कृपाळू उपस्थितीत झाला. या प्रकल्पाचा मुख्य हेतू म्हणजे गरजू क्षयरुग्णांना प्रथिनेयुक्त सप्लिमेंट्स आणि अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे, जेणेकरून त्यांची पुनर्प्राप्ती जलद होईल.

जिल्हा क्षयरोग अधिकारी सचिन जाधव यांनी रोटरी खारघर ला असाच कार्यक्रम दर महिनाला ठेवा, असा इच्छा जाहिर केले. रोटरी खारघर अध्यक्ष शैलेश पटेल यांनी हमीं दिली की असा कार्यक्रम आम्ही सतत चालू ठेवायचा पूर्ण प्रयत्न करू, पब्लिक इमेज डायरेक्टर कमलेश अगरवाल यांनी सांगितले.



# नवी मुंबई महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळी सण २९ ऑक्टोबरपासून सुरू होत असून नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नवी मुंबई महापालिका अधिकारी, कर्मचारी यांची दिवाळी आनंदात जावी यादृष्टीने सन २०२३-२४ या वर्षाकरिता महापालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी यांना ३३ हजार तसेच करार /तात्पुरत्या स्वरूपातील कर्मचारी यांना २७ हजार आणि आशा वर्कर यांना १७ हजार रुपये रक्कमेचे सानुग्रह अनुदान जाहीर केलेले आहे.

यामध्ये महापालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी. प्राथमिक व माध्यमिक शिक्षक यांना ३३ हजार रुपये सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे ठोक मानधनावर, किमान वेतनावरील तात्पुरत्या स्वरूपात करार पध्दतीवरील वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असणारे अधिकारी-कर्मचारी, रोजंदारीवरील आरोग्य सेवक, मानधनावरील बालवाडी शिक्षक व मदतनीस यांना २७ हजार रुपये इतकी सानुग्रह अनुदान रक्कम प्रदान केली जाणार आहे.

याशिवाय सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शासनाने कंत्राटी तत्वावर नेमलेले व शासनाकडून मानधन प्राप्त होणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही करार पध्दतीवरील कर्मचाऱ्यांप्रमाणे २७ हजार रुपये इतके सानुग्रह अनुदान त्याचप्रमाणे आरोग्य विभागातील आशा वर्कर यांना १७ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे.

# उद्योगपती रतन टाटा यांना श्रद्धांजली

**उरण : बातमीदार**

प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा गटातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे. उरणचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अजितदादा पवार गटाचे तालुकाध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी श्रद्धांजली वाहिली.

रतन टाटा आपल्यात नसले तरी त्यांचे विचार व कार्य या देशासाठी, सर्वांसाठी नेहमी आदर्श व प्रेरणादायी ठरतील व पुढील समाजाला एक नवी दिशा देतील, असे मत व्यक्त करत परीक्षित ठाकूर यांनी उद्योगपती रतन टाटा यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा विधानसभा अध्यक्ष वैजनाथ ठाकूर, युवा अध्यक्ष समत भोंगले, शहराध्यक्ष तुषार ठाकूर, तालुका सरचिटणीस दिनेश पाटील, युवा अध्यक्ष अमर घरत आदींनी श्रद्धांजली वाहिली आहे.

# भेंडखळ ग्रामपंचायतीतर्फे महिलांना आरी वर्क प्रशिक्षण

**उरण : बातमीदार**

भेंडखळ ग्रामपंचायतच्या माध्यमातून गावातील महिलांना आरी वर्क प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम शितल घरत यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत कार्यालय येथे आयोजित करण्यात आला.

त्या प्रशिक्षणासाठी गावातील महिला बचत गटच्या महिला, गावातील काही शिकाऊ महिला यांनी या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच मंजीता पाटील, उपसरपंच अभिजित ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य दिपक ठाकूर, अजित ठाकूर, लिलेश्वर भगत, ग्रामपंचायत सदस्या प्राची ठाकूर, सोनाली ठाकूर, संगीता भगत, शितल



ठाकूर, स्वाती पाटील, स्वाती घरत, अक्षता ठाकूर, ग्राम विकास अधिकारी किरण केणी यांचे विशेष सहकार्य लाभले.

ग्रामविकास अधिकारी किरण केणी यांनी प्रस्तावना करताना महिलांनी पूर्ण प्रशिक्षण केल्यावर प्रशिक्षणाचा चांगला फायदा होईल, असे सांगितले. सरपंच मंजिता पाटील व इतर सदस्यांनी या वेळी मार्गदर्शन केले. पहिली प्रशिक्षण बॅच सोमवार (दि.१४) पासून सुरू होत आहे. प्रशिक्षण कालावधी पंधरा दिवसाचा आहे.

होतकरू महिलांनी या प्रशिक्षणाचा मोठया प्रमाणात लाभ घ्यावा, प्रशिक्षणात मोठया प्रमाणात महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भेंडखळ ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे उरणमध्ये पथसंचलन

**उरण : बातमीदार**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघा (आरएसएस)तर्फे विजयादशमीला (दसरा) शनिवारी (दि.१२) उरण शहरात पथ संचलन काढण्यात आले.

या पथ संचलनात समाजातील सर्वच घटक, विविध मान्यवर सहभागी झाले होते. या वेळी ३६ गणवेशधारी स्वयंसेवक, १८ इतर मान्यवर या पथसंचलनात सहभागी झाले होते.

२७ सप्टेंबर १९२५ ला विजयादशमीच्या मुहूर्तावर डॉ. केशव हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. संघाच्या स्थापनेनिमित्त उरण शहरमध्ये विविध भागात संघ स्वयंसेवकांनी शनिवारी दसऱ्यानिमित्त केलेले संचलन पाहण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केली होती. उरण शहरातील गणपती चौकातील श्रीराम मंदिरात दसऱ्यानिमित्त संघाच्या परंपरा व प्रथेनुसार विधिवत शस्त्र पूजन करण्यात आले.





**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळ यांच्या वतीने आयोजित झंकार नवरात्रोत्सवाचा शेवटच्या दिवशी माजी नगरसेविका दर्शना भोईर व सहकारी सविता पाटील, सपना पाटील यांनी भेट दिली. त्यांचे वर्षा प्रशांत ठाकूर व अर्चना परेश ठाकूर यांनी स्वागत केले.**

## निवडक

### जोहे कॉलेजला विद्यार्थ्यांकडून झाडे भेट



**पेण** : तालुक्यातील ज्युनिअर कॉलेज जोहे येथील इयत्ता अकरावी व बारावीतील सर्व विद्यार्थ्यांनी मिळून दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर कॉलेजला फुलझाडे भेट दिली. प्राचार्य गलांडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या फुलझाडांचे कॉलेजच्या प्रांगणात विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण उपक्रमात प्राचार्य यू.एस.गलांडे, प्रा. आर.आर.म्हात्रे, प्रा.के.ए.गोरे, प्रा. ए.एस.माळी, प्रा. आर.बी.पाटील, प्रा. एस.एस.बच्छाव यांच्यासह विद्यार्थी व कर्मचारी सहभागी झाले होते. फुलझाडांचे संगोपन व दररोज पाणी देण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवरच देण्यात आली.

### सुधाकर राठोड यांना प्रशस्तीपत्र

**चौक** : इर्शाळवाडी दुर्घटनेत रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कौतुक करून त्यांना प्रशस्तीपत्र दिले. नवी मुंबई येथील एका कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इर्शाळवाडी दुर्घटनाग्रस्तांना नवीन घरांच्या चाव्या दिल्या. कोणत्याही नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्तीमध्ये बचावकार्यासाठी धैर्य आवश्यक असते, तर पुनर्निर्माणसाठी इच्छाशक्ती. प्रयत्नांची पराकाष्ठा करून अनेकांना जीवदान दिले आणि पुनर्वसन करण्यासाठी जीवाचे रान केले. म्हणूनच एका वर्षात आपण हे पुनर्वसन करू शकलो, असे मुख्यमंत्री यांनी आपल्या प्रशस्तीपत्रात नमूद करून नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांचे कौतुक केले आहे.

### आशासेविकांसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम

**रोहे** : सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीजच्या सीएसआर विभाग प्रमुख माधुरी सणस यांच्या मार्गदर्शनानुसार शाश्वत विकास लक्ष: सशक्त पंचायत, सशक्त भारत अंतर्गत आशासेविकांसाठी विशेष क्षमताबांधणी कार्यक्रम वरसे येथे शुक्रवारी (दि.११) झाला. या कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण आरोग्य व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आशासेविकांना अधिक सक्षम बनवणे असे संजय कचरे यांनी प्रस्तावणे मध्ये मत मांडले. दरम्यान क्षमताबांधणी कार्यक्रमामध्ये एकूण ७५ आशासेविकांनी सहभाग घेतला. प्रशिक्षणामध्ये संवाद कौशल्य, नेतृत्व आणि मानसिक स्वास्थ्य तसेच शासकीय योजनांची सविस्तर माहिती किशोर काळोखे व चेतन वाघ यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास तालुका आरोग्य अधिकारी प्रियांका साळुंखे, झावरे, अनिल हावरे, सुदर्शन केमिकलचे अधिकारी महेश डेरीया, स्वाती मोहिते उपस्थित होत्या.



**रोहा : येथील प्रसिद्ध कपडा व्यापारी विकास कांकरिया यांची मुलगी विधी कांकरिया ही दीक्षा घेणार आहे. त्यांचा गुजराती समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी गुजराती समाजाचे अध्यक्ष भावेश दामणी, नगर पालिकेचे माजी गटनेते महेंद्र गुजर, महिलाध्यक्ष दक्षा शहा, समाजबांधव जगदीश दामणी, विलास गुजर, मिलन शाह, आशिष शाह व समाजबांधव उपस्थित होते.**

# रोहेकरांसाठी मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल

## खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते भूमिपूजन

**रोहे : प्रतिनिधी**

रोह्यात मोठ्या प्रमाणात विकास झाला,परंतु हॉस्पिटल नव्हते. खासदार झाल्यानंतर माझी अदानी यांची भेट झाली. मी रोहेकरांसाठी हॉस्पिटल बांधण्याबाबत सांगितले. त्यांनी होकार दिला. आज अत्याधुनिक हॉस्पिटल रोहा येथे होणार आहे. सगळ्या आजारांवर रोह्यात उपचार होणार आहेत. येथे राज्य व केंद्र सरकारच्या योजना येथे राबविण्यात येतील, असे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नातून अदानी फाउंडेशन व वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने बांधण्यात येत असलेल्या मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटलचे भूमिपूजनप्रसंगी ते रोठखुर्द येथे आयोजित कार्यक्रमात




बोलत होते.

या वेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, वरदा तटकरे, वेदांती तटकरे, अदानी फाउंडेशन सीईओ डॉ. अभिषेक लखटाकीया, दिघी पोर्ट सीईओ कपील खंडेलवाल, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, कामगार नेते वढावकर, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी सभापती रामचंद्र सकपाळ, सुदर्शनचे साईट हेड विवेक गर्ग, राजेंद्र पोकळे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, मयुर दिवेकर, सरपंच गीता मोरे, अमित मोहीते, अरविंद मगर, जनार्दन मोरे, नरेश पाटील, रामाशेठ म्हात्रे, उत्तम नाईक, हरीचंद्र मोरे आदी उपस्थित होते.

ना.आदिती तटकरे यांनी, हे हॉस्पिटल रोहेकरांचे खूप वर्षांचे स्वप्न होते. मी अदानी फाउंडेशनचे मनापासून आभार मानते. आज होत असलेल्या या रुग्णालयातून नागरिकांना योग्य व रास्त दरात उपचार मिळावेत हेच आमचे उद्दिष्ट आहे, असे सांगितले.

प्रास्ताविकात माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी, आज एका गोष्टीचे समाधान आहे. रायगडवासियांना दिलेला शब्द आज आपण कृतीमध्ये उतरतोय. त्याबद्दल साहेब आपले आभार व्यक्त करतो. अदानी फाउंडेशनच्या सर्वेसर्वा डॉ. प्रीती गौतम अदानी यांचेसुद्धा मला मन:पूर्वक आभार या ठिकाणी व्यक्त करायचे आहे. आज जवळपास ३० बेड हॉस्पिटल परिसरामध्ये उभे रहात आहे. यामध्ये शैल्य चिकित्सक, डोळे, नाक, कान तज्ज्ञ, स्त्री रोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, दंतचिकित्सक, डायलिसिस आणि विविध वैद्यकीय सेवा आपण याच्या माध्यमातून देणार आहे. आयसीओ, ऑपरेशन थेटर, ओपीडी, टीएमटी आणि इतरसुद्धा अत्याधुनिक पद्धतीचे टेस्ट केल्या जातील. या रुग्णालयात राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार आहेत, असे सांगितले.

या वेळी वरदाई चॅरिटेबल ट्रस्टच्या विश्वस्त वरदा तटकरे यांनी सगळ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी दिघे यांनी मानले.

## आंग्रे घराण्यातील शस्त्रपुजनाची परंपरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या वारसांनी दसऱ्याच्या दिवशी आंग्रे घराण्याच्या शस्त्रांची विधीवत पूजा करण्यात आली.

दर्यासारंग सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या घराण्यात आजही पूर्वापार शस्त्रपूजन विजयादशमी दिवशी केले जाते. सरखेल कान्होजी आंग्रे यांचे नववे वंशज रघुजीराजे आंग्रे हे यांनी आजही शस्त्रपूजन परंपरा जोपासली आहे. मराठा आरमाराचे प्रमुख असलेल्या कान्होजी आंग्रे यांनी कोकण किनारपट्टीचे परकीय आक्रमणांपासून संरक्षण केले. सागरावर निर्विवाद वर्चस्व त्यांनी राखले.



सागरी सीमा सुरक्षित रहाव्या यासाठी त्यांनी प्रयत्न केले. यासाठी अनेक लढाया त्यांनी केल्या. या वेळी आंग्रे यांनी वापरलेल्या आयुधांची त्यांच्या वारसांनी जोपासना केली आहे.

यात प्रामुख्याने सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या पाच किलो वजनाच्या तलवारीचा आणि ढालीचा समावेश आहे. याशिवाय भाले, गुप्ती, बंदूक आदी वापरलेली युद्धातील शस्त्र, कसरत करायचे मुदगल याचाही समावेश आहे.

## बोरघाटात बर्निंग कारचा थरार; पाच प्रवासी बालंबाल बचावले

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील आडोशी बोगद्याजवळ हुंडाईची वेन्यू कार रविवारी (दि.१३) जळून खाक झाली. धोका लक्षात आल्याने कारमधील प्रवासी सर्वजण तत्काळ गाडीतून उतरल्याने अनर्थ टळला. ही घटना दुपारी १ वा. सुमारास आडोशी बोगद्या दरम्यान पुणे लेनवर घडली.

ठाणे दिव्याहून एकविरा दर्शनेसाठी निघालेल्या कारमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने धूर येऊ लागताच चालकाने कार शोल्डर लेनवर थांबवली आणि सर्वजण तत्काळ गाडीतून उतरले. खोपोली अग्निशमन दल, आयआरबी पेट्रोल लिंग, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स आणि महामार्गावरील बोरघाट वाहतूक पोलीस यंत्रणेचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल होत मदतकार्य केले.

हुंडाई वेन्यू कार मुंबईहून पुणे दिशेने जात असता शॉर्टसर्किट झाल्यामुळे कारला आग लागली आहे. सदर घटनेत पाच प्रवाशांपैकी कोणालाही दुखापत नाही. आग विझवण्यासाठी फायर ब्रिगेडच्या दोन गाड्या दाखल होत आग विझवली.



## विहूर ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे भूमिपूजन

**मुरूड : प्रतिनिधी**

स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतून २५ लाख रुपयांची निधी आमदार महेंद्र दळवी यांनी मुरूड विहूर ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यासाठी उपलब्ध करून दिला आहे. या इमारतीचे भूमिपूजन गावाचे ज्येष्ठ नागरिक काशिनाथ पाटील व आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व शिळापूजन करून करण्यात आले.

या वेळी आमदार महेंद्र दळवी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, भगिरथ पाटील, भाई सुर्वे, यशवंत पाटील, सरपंच रेश्मा तपेसर, गाव अध्यक्ष संतोष पोटले, उपाध्यक्ष अजय वाडकर, सदस्य गणेश भोईर, यास्मिन हालडे, दिनेश मिणमिणे, महेंद्र कदम, विद्या दळवी परेश तांबे, काशिनाथ पाटील, संदेश मोहीते, प्रकाश भोईर, नितेश दळवी, यतीशाम किल्लेदार, मोहतशीम पांगारकर, संजय तांबे, आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

विहूर ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय मोडकळीस आले होते. याची दखल आमदार महेंद्र दळवी यांनी घेऊन निधी उपलब्ध करून दिल्याने ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी, सध्या २५ लाख रुपये ग्रामपंचायत कार्यालयासाठी मंजूर केले आहेत. हे कार्यालय सुसज्ज व दर्जेदार बनणार आहे. जर निधी कमी पडला तर अजून निधी उपलब्ध करून देऊ, असे आश्वासित केले.



## उतेखोल केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

पंचायत समिती अंतर्गत उतेखोल केंद्राची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद राजिप शाळा उतेखोल येथे केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

प्रथम सरस्वती देवीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर खर्डी बुद्रुक आदिवासीवाडी शाळेचे मुख्याध्यापक रमेश उभारे यांनी समूहगीत गायन करून शिक्षण परिषदेची सुरुवात झाली. उतेखोलवाडी शाळेच्या शिक्षिका विनया जाधव यांनी विद्यार्थी लाभाच्या विविध योजनांविषयी सखोल माहिती दिली व त्यांचा लाभ घेऊन विद्यार्थी उपस्थिती वाढविण्यासाठी फायदा कसा होतो, ते सविस्तर सांगितले.

नवोप्रकम व कृती संशोधन याविषयी शाळा चव्हाणवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना मेथा यांनी या विषयावर सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले. नवोपक्रम या विषयात आणखी माहिती उतेकर यांनी सांगितली. विद्यांजली पोर्टल या विषयासंबंधी बामणोली शाळेच्या मुख्याध्यापिका सुधा मोरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

आयसीटी प्रशिक्षणात उपयोग या विषयासंबंधी शाळा विकास कॉलनी शाळेच्या मुख्याध्यापिका शुभांगी येलवे यांनी आपण शिक्षणात आयसीटीचा वापर कसा केला जातो तसेच गुणवत्तावाढीसाठी आयसीटीचा वापर सर्वांनी करावा असे आवाहन केले.

उतेखोल केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी, शालेय पोषण आहार, स्वच्छता, नवभारत साक्षरता, शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षा, तक्रारपेटी व सखी सावित्री, परसबाग आदी प्रशासकीय विषयांवर मार्गदर्शन केले.

उतेखोल बिटाच्या वरिष्ठ विस्तार अधिकारी तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुरेखा मारुती तांबट यांना सन्मानित करण्यात आला, तसेच शंकर शिंदे यांची पदवीधर शिक्षक पदावरून पदोन्नतीने केंद्रप्रमुख पदावर बढती झाली आणि उतेखोल केंद्राचा कार्यभार स्वीकारला म्हणून सत्कार करण्यात आला.

खर्डी बुद्रुक आदिवासीवाडीचे मुख्याध्यापक रमेश बाळू उभारे यांची माणगाव प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीच्या चेअरमनपदी निवड झाली म्हणून, बामणोली शाळेच्या मुख्याध्यापिका माजी प्रभारी केंद्रप्रमुख सुधा साळवी यांचाही सत्कार करण्यात आला.



## कुटुंबाच्या आठवणींनी इर्शाळवाडीत आक्रोश

### सरपंच रितू ठोंबरे यांनी दिला धीर



**चौक : प्रतिनिधी**

इर्शाळवाडी दरडग्रस्तांनी घराचा ताबा घेतला, पण घरात कुणासाठी राहायचे, कुणासाठी जगायचे असा आकांत केला. या वेळी सरपंच रितू ठोंबरे यांनी या दरडग्रस्तांना धीर दिला.

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी दरडग्रस्तांच्या नवीन घरांच्या चाव्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई येथील एका कार्यक्रमात दिल्या. एका घरच्या परसबागेच्या कठड्यावर एक वयस्कर आजी रडत होती. तिच्या आवाजाच्या दिशेने ग्रुप ग्रामपंचायत चौक सरपंच रितू ठोंबरे गेल्या. आजीला शांत करण्याचा प्रयत्न फोल ठरला. आजी अचानक शांत झाल्या. या वयात कसला आजार? आजार त्याच दिवशी पळाला ज्या दिवशी दरड कोसळली तेव्हा आपले मूल गेले. दोन महिन्यांपूर्वी घरधनी गेल्याचे तिने सांगितले. आता घरात कुणासाठी राहायचे? कुणासाठी जगायचे? हा प्रश्न तिला भेडसावत आहे.

वसतिगृहात शिकत आहेत म्हणून वाचलेली मुले, मुले जगली. आई-बाबा गेले. मोबाईल बघण्यास घराच्या बाहेर गेलो म्हणून वाचलो, तर आश्रमशाळेतून तब्येत बरी नाही म्हणून आलेल्या नातवाला मासे आणण्यासाठी अंधाऱ्या रात्री गेलेले कमलू आजोबा वाचले. देव तारी त्याला कोण मारी? नवीन सुसज्ज घरात गेले, पण आपल्याबरोबर आपली माणसे नाहीत, याची जाणीव प्रत्येक घरात होत होती.

## खरिवली येथे खेळ पैठणीचा कार्यक्रम उत्साहात

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

राधाकृष्ण तरुण मंडळ खरिवली व नवदीप महिला मंडळ यांच्या सौजन्याने नवरात्रोत्सवानिमित्ताने न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते.

न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा फेम हरेश पाटील पेण यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला, तर खरिवली गावातील महिला व तरुणींनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. खेळ पैठणीचा कार्यक्रमात नीलिमा अमर ढगे यांनी प्रथम पारितोषिक मिळविले तर निकिता संजय हेलांडे द्वितीय तर मेघा मिलिंद दाभोलकर यांनी तृतीय क्रमांक मिळविला. सर्व विजेत्यांचे राधाकृष्ण तरुण मंडळ खरिवली व नवदीप महिला मंडळ खरिवली यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.



कार्यकमाचे आयोजन अध्यक्ष सचिन दाभोलकर, खजिनदार संजय हेलंडे, सदस्य दत्ता भेसरे, अमर ढगे, सुरज घाटवल, प्रमोद गायकर, रतिश महाडिक, रोशन महाडिक, अजय ढगे, अजय परबळकर, योगेश घालवला, सत्यवान बाटे, गणेश हेलंडे, विनायक तळकर, ऋतिक घाटवल, देवेंद्र गायकर यांनी केले.

ज्येष्ठ मान्यवर मिलिंद दाभोलकर, जनार्दन ढगे, राजेंद्र महाडिक संजय महाडिक, अनिल गायकर, विलास गायकर, योगेश ढगे, राजेंद्र तटकरे, प्रमोद हेलंडे, राजेंद्र गायकर, अमोल दाभोलकर, दिलीप महाडिक, नारायण तळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख उपस्थितीत खेळ पैठणीचा कार्यक्रम झाला.

## शाळांमध्ये शारदोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

**सुधागड** : नवरात्रोत्सव म्हटले की, नऊ दिवस सर्वांच्या आनंदाला उधाण येते. गावागावांत घटस्थापनेच्या दिवशी देवी बसतात. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील बहुसंख्य शाळांमध्येदेखील घटस्थापनेला सरस्वती मातेच्या रूपाने देवी बसवली गेली. संपूर्ण नऊ दिवस शाळांमध्ये उत्साही व प्रसन्न वातावरण असते. गरबा, हादगा किंवा भोंडला, नाचाच्या फेऱ्या याबरोबरच विविध कार्यक्रमदेखील शाळेत उत्साहात राबविले गेले. शाळाशाळांमध्ये साफसफाई करून शाळेतील एका वर्गखोलीत देवीसाठी लाकडी आरास किंवा तयार देव्हाऱ्यात सरस्वतीची मूर्ती ठेवून तिची मनोभावे प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. काही ठिकाणी वर्गखोल्या रंगवण्यात आल्या, तर काही शाळांमध्ये देवी ठेवणाऱ्या वर्गखोलीची सजावट करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी यात उत्साहाने सहभाग घेतला.

# भारताने पाकिस्तानला टाकले मागे

## कॅलेंडर वर्षात आतापर्यंत एकूण २१ टी-२० जिंकले

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने तिसऱ्या टी-२० सामन्यात बांगलादेशचा १३३ धावांनी पराभव केला. यासह टीम इंडियाने मालिकेत ३-० असा क्लीन स्वीप केला. या विजयाच्या जोरावर भारताने पाकिस्तानला मागे टाकले आहे.

तिसऱ्या टी-२० सामन्यात संजू सॅमसनने शतक, तर सूर्यकुमार यादवने अर्धशतक झळकावले. हार्दिक पांड्यानेही तुफानी खेळी केली, ज्यामुळे भारताने बांगलादेशला २९८ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ निर्धारित षटकात ७ बाद १६४ धावाच करू शकला.



भारताने कॅलेंडर वर्ष २०२४मध्ये आतापर्यंत एकूण २१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने जिंकले आहेत. त्यामुळे भारताने एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक सामने जिंकण्याच्या बाबतीत पाकिस्तानला मागे टाकले आहे. पाकिस्तानने २०२१मध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण २० सामने जिंकले होते. भारतीय संघाला या वर्षी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अजूनही चार टी-२० सामने खेळायचे आहेत, जरी संघाने सर्व सामने जिंकले तरी ते युगांडाचा विश्वविक्रम मोडू शकणार नाही.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक सामने जिंकण्याचा विक्रम युगांडाच्या संघाच्या नावावर आहे. युगांडाने २०२३ साली टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण २९ सामने जिंकले होते.

# राष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धेसाठी रायगडच्या पाच खेळाडूंची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तायक्वांडो फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने ४०वी राष्ट्रीय सीनिअर स्पर्धेचे आयोजन पाँडेचरी येथे १७ ते २० ऑक्टोबरदरम्यान करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात रायगड जिल्ह्यातील पाच खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.



रायगड तायक्वांडो असोसिएशनचे पुमसे प्रकारातील खेळाडू प्राजक्ता अंकोलेकर, मुग्धा भोसले, प्रशांत घरत, राकेश जाधव, रूपेश माळी यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. त्याचप्रमाणे प्रशिक्षक तेजस माळी व स्पर्धा प्रमुख म्हणून आंतरराष्ट्रीय पंच सुभाष पाटील यांची निवड करण्यात आली आहे

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल प्राजक्ता, मुग्धा, प्रशांत, राकेश, रूपेश यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून व कॉलेजच्या प्राचार्यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी रोडपाली पोलीस मुख्यालय येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय मैदानी (ॲथलेटिक्स) स्पर्धेत यश प्राप्त केले. राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत पनवेल महापालिकेने ही स्पर्धा आयोजित केली होती.



या स्पर्धेत सीकेटी विद्यालयाचा अमोघ ठोंबरे याने गोळाफेकमध्ये प्रथम, भावेश बोरसे १०० मीटर धावणे, ४X१०० रिले प्रथम, अथर्व पाटील उंच उडी द्वितीय ४X१०० मी. रिले प्रथम, धीरज कोळी लांब उडी प्रथम व तिहेरी उडी द्वितीय, रणवीर कुमार सिंग २०० मी. धावणे प्रथम, ४X१०० रिले प्रथम, १००मी. धावणे द्वितीय, प्रिन्स दुबे ४X१००मी. रिले प्रथम, ४००मी. धावणे तृतीय, अभिषेक चव्हाण ३००० मी. द्वितीय, १५००मी. द्वितीय, मेल्विन नादार १५०० मी. धावणे तृतीय, ३००० मी. धावणे तृतीय, ओम फडके उंच उडी तृतीय, समीक्षा बोरगे थाळीफेक प्रथम, गोळाफेक तृतीय, नेहा सोनार २०० मी. धावणे तृतीय, वेदिका चेतन म्हात्रे तिहेरी उडी तृतीय आणि वेदिका शरद जाधव हिने लांब उडीत तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## बाबर होणार संघातून बाहेर?

**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा स्टार फलंदाज बाबर आझम गेल्या काही काळापासून अत्यंत खराब फॉर्मातून जात आहे. वृत्तानुसार बाबरला दुसऱ्या कसोटी सामन्यात प्लेइंग इलेव्हनमधून वगळले जाण्याची शक्यता आहे.

बाबर आझमच्या कामगिरीत सातत्याने घसरण होत असून त्याची बॅट शांत आहे. तो संघासाठी सर्वात मोठी डोकेदुखी बनला आहे. पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना १५ ऑक्टोबरपासून मुलतानच्या मैदानावर खेळवला जाणार असून पीसीबीने अद्याप संघ जाहीर केलेला नाही.

# आगरी शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळेचे बॉक्सिंग स्पर्धेत सुयश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड व पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत आगरी शिक्षण संस्थेच्या प्राथमिक विद्यालयाने सुयश संपादन केले आहे..

स्पर्धा पनवेलच्या लोकनेते दि.बा. पाटील हायस्कूल येथे झाली. या स्पर्धेत आगरी शिक्षण संस्थेच्या प्राथमिक विद्यालयातील अतुल निरेशकुमार पात्रा व गणेश कृष्णदेव पात्रे यांनी सुवर्ण, मानव दीपक बहेकर, पवन धनाजी राजगे, वेदांत पांडुरंग पवार यांनी रौप्य, तर निरव कुमार धुमाळ, विश्वास कृष्णा राठोड, श्रेयस पल्लवी वाघमारे यांनी कांस्यपदक जिंकले.

या यशाबद्दल मुख्याध्यापिका मनीषा तांडेल व सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे. या विद्यार्थ्यांना योगेश बहेकर यांचे मार्गदर्शन लाभले तसेच वर्गशिक्षक अश्विनीकुमार कोलते, राजेंद्र पाटील, विद्या गायकवाड यांनी प्रोत्साहन दिले.

# माझी माऊली चषक कॅरम स्पर्धेत समीर, मयांक, स्वस्तिक उपांत्यपूर्व फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळ-जेजे व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित आंतरशालेय १६ वर्षाखालील मुलांच्या विनाशुल्क कॅरम स्पर्धेत बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल-वरळीचा समीर खान, जेकब ससून हायस्कूल-नागपाडाचा मयांक सोळंकी, सेंट जोसेफ हायस्कूल-डोंगरीचा स्वस्तिक सुर्वे, डॉ. शिरोडकर हायस्कूल-परेलचा वेदांत हळदणकर आदींनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.



समीर खानने प्रतिकूल स्थितीमधील पहिला बोर्ड राणीसह ४-० अशा आघाडीने घेतल्यामुळे पाटकर विद्यालयाच्या गौरांग मांजरेकरचे टेन्शन वाढले. त्याचा लाभ उठवत समीर खानने १८-० असा सहज विजय मिळवीत तिसरी फेरी जिंकली.

जे.जे. हॉस्पिटल कंपाऊंड-भायखळा येथील या कॅरम स्पर्धेत मयांक सोळंकी विरुद्ध जितेंद्र जाधव यामधील तिसऱ्या फेरीची लढत अटीतटीमध्ये रंगली. प्रारंभी ६-० अशी आघाडी घेणाऱ्या जितेंद्रचे आव्हान मयांकने ९-६ असे संपुष्टात आणून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. अन्य सामन्यात वेदांत हळदणकरने दुर्वांक शेलारचा १५-३ असा, स्वस्तिक सुर्वेने सर्वेश परुळेकरचा १०-२ असा. तर आयुष पालकरने आदेश महाडिकचा ७-३ असा पराभव करून तिसऱ्या फेरीत विजय संपादन केला.

स्पर्धेमध्ये मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड आदी जिल्ह्यामधील शालेय-कॉलेज ६४ खेळाडू सहभागी झाले आहेत. २४व्या शालेय कॅरम स्पर्धेचे सातत्य राखत मंडळाने सबज्युनिअर कॅरमपटूना प्रोत्साहन देण्यासाठी चँम्पियन कॅरम बोर्डावर दर्जेदार स्पर्धेचे पूर्णपणे मोफत आयोजन केले आहे.

# विभागीय कुस्ती स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांनी रौप्यपदक जिंकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयद्वारा कळंबोली रोडपाली येथील पोलीस मुख्यालय या ठिकाणी विभागीय कुस्ती स्पर्धा झाली. या ग्रीक रोमन कुस्ती क्रीडा स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी रौप्यपदक पटकाविले.

सीकेटी विद्यालयाच्या वेदांत विनोद नाईक, पवन पावशे यांनी कुस्तीच्या ग्रीक रोमन प्रकारात आणि सिद्धेश धनाजी तांडेल







याने फ्रीस्टाईल प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला.

याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी.देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## कुस्ती स्पर्धेत समृद्धी देशमुख, श्रेया शिर्केला रौप्यपदक

**रोहे : प्रतिनिधी**

तटकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या जीडीटी फ्युचर स्कूल एन ज्युनियर कॉलेज वरसगाव कोलाड येथे इयत्ता बारावी सायन्समध्ये शिकत असणारी समृद्धी जितेंद्र देशमुख हिने मुंबई विभागीय कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त केले. त्याचप्रमाणे एमडीएन इंटरनॅशनल स्कूलध्ये सातवीत शिकत असलेली श्रेया सागर शिर्के या विद्यार्थिनीने जिल्हास्तरीय स्पर्धेत रौप्यपदक मिळवले.

या यशासाठी संस्थेचे अध्यक्ष संदीप तटकरे यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना मार्शल आर्ट शिक्षक अमर यादव, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर देवेंद्र चांदगावकर, मुख्याध्यापिका योगिनी देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

# कर्जत ४०+ क्रिकेट हंगामाचा शुभारंभ

## व्यसनमुक्ती चषक स्पर्धेद्वारे देणार सामाजिक संदेश

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे कर्जतमधील ४०+ क्रिकेट हंगामाचा शुभारंभ विजयादशमी (दसरा)च्या मुहूर्तावर करण्यात आला. यंदा व्यसनमुक्ती ४०+ चषक स्पर्धा आयोजित करून व्यसनमुक्तीचा सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

सुरुवातीला भारताचे एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व उद्योजक स्व. रतन टाटा यांना कर्जत ४०+तर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर नवीन हंगामाचा शुभारंभ ज्येष्ठ मार्गदर्शक सदस्य मधुकर सुर्वे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. या वेळी रणजित जैन, शिरीष दिघे आदी उपस्थित होते.



आम्ही एक सामाजिक संकल्पना घेऊन आपल्या ४०+ क्रिकेट स्पर्धा आयोजित करीत आलेलो आहोत. त्याप्रमाणे नवीन हंगामात व्यसनमुक्ती ४०+ चषक या नावाने एक सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करणार आहोत, असे कर्जत ४०+ क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष शशांक शेट्टी यांनी जाहीर केले तसेच खेळांमधून आनंद मिळवून एक धाव आरोग्यासाठी व पुन्हा एकदा तारुण्याकडे आणि खेळांमधून एक पाऊल समाजासाठी या ब्रीद वाक्याप्रमाणे आपली वाटचाल अशीच करीत राहू, असा निर्धार व्यक्त केला.

या वेळी कर्जत ४०+ क्रिकेट परिवारातील गजेंद्र दांडेकर, विनायक परांजपे, प्रवीण गांगल, सचिन मनोरे, सुनील खातू, राजूशेठ ओसवाल, विराग फाटक, प्रकाश गायकवाड, सुरेश मोहिते, पांडुरंग मोहिते, पांडुरंग पाटील, भाई जाधव, बाळा धनवे, तुषार जोशी, दिपंकार सालये, गिरीश सुर्वे, किरण देशमुख, दिनेश कडू, समीर चव्हाण, जयवंत पिंगळे, संदीप देशमुख, मंगेश म्हसे, विशाल निमकर्डे, सुरेश गायकवाड, सुरेश ठाकरे, सुजित जाधव, चंद्रकांत दगडे, सुभाष पाटील, मिसे, बाळा पाटील, पराग कोकजे, जितेंद्र देशमुख, जगदीश पालकर, ध्रुव खातू, दिव्य सुर्वे आदी उपस्थित होते.



# नवोदित, शिवमुद्रा प्रतिष्ठान संघ कुमार गट कबड्डी स्पर्धेच्या फायनलमध्ये





**मुंबई : प्रतिनिधी**

नवोदित संघ, शिवमुद्रा प्रतिष्ठान यांनी शिवनेरी सेवा मंडळाने आयोजित केलेल्या कुमार गट कबड्डी स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक दिली. विशेष व्यावसायिक गटात गतविजेत्या भारत पेट्रोलियमसह इन्शोअर कोट, न्यू इंडिया एन्शो; रिझर्व्ह बँक यांनी उपांत्य फेरी गाठली.

दादर (पूर्व) शिंदेवाडी येथील भवानीमाता क्रीडांगणावर सुरू असलेल्या कुमार गटाच्या उपांत्य सामन्यात नवोदित संघाने काळाचौकीच्या अमर मंडळाला ४३-२६ असे सहज नमविले. पहिल्या डावात दोन लोण देत २४-०८ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या नवोदितने दुसऱ्या डावात सावध खेळ करीत आपला विजय साकारला. अथर्व सुवर्णा, शौर्य धुरी यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. दुसऱ्या डावात अमरच्या रोहित शिंदेने कडवी लढत देत पराभवतील अंतर कमी केले.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात शिवमुद्रा प्रतिष्ठानने विजय क्लबवर ३५-१४ अशी लीलया मात केली. विशाल लाड, आर्णव हातकर यांच्या पूर्वार्धातील झंझावाती खेळाने शिवमुद्राने विजयवर तीन लोण देत २८-०१ अशी महत्त्वपूर्ण आघाडी घेतली. उत्तरार्धात विजयच्या आरिफ शेखने बऱ्यापैकी प्रतिकार करीत एक लोण परतविण्यात यश मिळविले, पण संघाचा पराभव टाळण्यात तो अपयशी ठरला.

विशेष व्यावसायिक गटाच्या उपांत्यपूर्व सामन्यात भारत पेट्रोलियमने युनियन बँकेचा २६-१४ असा पराभव केला. आकाश अरसुळ, आकाश गायकवाड यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. दुसऱ्या सामन्यात इन्शोअर कोटने चुरशीच्या लढतीत २७-२२ असे नमवित आगेकूच केली. राकेश, विनीत इन्शोअर कोटकडून, तर अक्षय तावडे, सुशांत साईल मुंबई कस्टम कडून उत्कृष्ट खेळले.

रिझर्व्ह बँकेने बलाढ्य मुंबई पोलीस संघाचा प्रतिकार २४-१५ असा मोडून काढला. विश्रांतीपर्यंत दोन्ही संघानी एकमेकांना अजमाविण्यात वेळ घेतल्याने गुण फलक ८-८ अशा बरोबरीत होता. नंतर मात्र रिझर्व्ह बँकेच्या तुषार शिंदे, यश राक्षेने आपला खेळ उंचावित ९गुणांनी बँकेच्या गळ्यात विजयाची माळ घातली. पोलीस संघाचा हनुमंत गर्जे एकाकी लढला. न्यू इंडिया एशोरन्सने मुंबई पोष्टलचा प्रतिकार २४-१८ असा मोडून काढला. पूर्वार्धात ०९-११ अशा पिछाडीवर पडलेल्या न्यू इंडियाने उत्तरार्धात मात्र गतिमान खेळ करीत हा विजय साकारला.

उपउपांत्यपूर्व सामन्यात मुंबई कस्टमने मध्य रेल्वेला २५-१६, न्यू इंडियाने सेंट्रल बँकेला २४-१५, युनियन बँकेने हिंदुजाला २५-१७, इन्शोअर कोटने बेस्टला ४०-२१, रिझर्व्ह बँकेने मध्य रेल्वे माटुंगा ला २२-१७, तर मुंबई पोष्टलने रुबीचा ३६-१९ असा पराभव करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली होती.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com